# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक **VISHWA PANTHASTHA**

वर्ष : १ । अंक : ५ । ऑगस्ट - सप्टेंबर २०१८ (मासिक) । मूल्य ₹ १०० । AED 10 । US$ 2 www.panthastha.com



८वे विश्व मराठी साहित्य संमेलन

दुबई - २०१८

( युनायटेड अरब एमेरात )

विशेषांक

## विश्व मराठी साहित्य सम्मेलन दुबई २०१८-१९

आयोजक

शिवसंघ प्रतिष्ठान

# सातवे विश्व साहित्य संमेलन – बाली ( इंडोनेशिया )

**अध्यक्ष : मा. श्री. डॉ. तात्याराव लहाने. प्र. पाहुणे – मा. श्री. जिवन सोनवणे.**






# अनुक्रमणिका


- संपादकीय : संरक्षण– नवा दृष्टिकोन ............. ७
- सातत्य पूर्ण साहित्य यज्ञ ........................... १०
- वैद्यकिय विश्वाचा प्रसार मराठी माध्यमातून....... ११
- मराठी संवर्धन आपल्याच हाती .................... १२
- सुरक्षित भारत समृद्ध भारत ........................ १४
- मराठी साहित्य व अंतर्गत सुरक्षितता ............. २०
- स्वा. सावरकरांचा संरक्षण विषयक दृष्टिकोन........ २२
- सागरा प्राण तळमळला .............................. २३


विश्व पांथस्थ


**विश्व पांथस्थ**
वर्ष १, अंक ५
ऑगस्ट–सप्टेंबर २०१८

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
**संदीप वसंतराव कडवे**

वितरण साहाय्य
**राजन तावडे**, अबू धाबी
**गजानन खोलगडे**, बहरीन
**धवल नांदेडकर**, फुजेरा
**वीरभद्र कारेगावकर**, अजमान
**किशोर मुंढे**, अजमान

मुखपृष्ठ आणि सजावट
**मंदार प्रिंटर्स, पुणे**

**मूल्य : ₹100 | AED 10 | US$ 2**

**Vishwa Panthastha**
Year 1, Issue 5
August -Sept. 2018

First Marathi Monthly For NRI Maharashtrians

Editor
**Sandeep Vasantrao Kadwe**

Distribution Support
**Rajan Tawde,** Abu Dhabi
**Gajanan Kholgade,** Bahrain
**Dhawal Nandedkar,** Fujerah
**Veerbhadra Karegaonkar,** Ajman
**Kishor Mundhe,** Ajman

Cover & Design
**Mandar Printers, Pune**

**Price : ₹. 100 | AED 10 | US$ 2**

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए–७०३, निसर्ग सिटी–२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११०५७ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक – संदीप वसंतराव कडवे**
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob.: +91 9860678844
e-mail : editor@panthastha.com
website: www.panthastha.com
**Editor - Sandeep Vasantrao Kadwe**
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



**या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

# ८ वे मराठी विश्व साहित्य संमेलन, दुबई

**दिनांक : ९ सप्टेंबर, २०१८**

**स्थळ :- आयोजन : शिवसंघ प्रतिष्ठान, पुणे.**

## ✻ कार्यक्रम पत्रिका ✻

✻ **ग्रंथपूजा**

✻ **स्वागत गीत**

✻ **उद्‍घाटन सोहळा**

-: प्रमुख आतिथी :-

मा. श्री. एअर मार्शल भुषण गोखले : अध्यक्ष
मा. श्री. सुरेश खोपडे : उद्‍घाटक
मा. श्री. निलेश गायकवाड : कार्याध्यक्ष
मा. श्री. प्रमोद गायकवाड : आयोजक
मा. डॉ. संदीप कडवे : प्रमुख पाहुणे

✻ **स्मरणिका प्रकाशन व पुस्तक प्रकाशन सोहळा**

✻ **चहापान**

✻ **राणी येसुबाई कादंबरीवर व्याख्यान-** सौ. शुभा साठे

✻ **परिसंवाद**

-: सहभागी वक्ते :-

मा. श्री. पराग पोतदार :
मा. श्री. हरीष केंची :
मा. श्री. मधुकर सावरकर :
मा. श्री. आनंद सहस्त्रबुध्दे

✻ **भोजन मध्यान्ह**

# ८ वे मराठी विश्व साहित्य संमेलन, दुबई

## दिनांक : ९ सप्टेंबर, २०१८

## स्थळ :- आयोजन : शिवसंघ प्रतिष्ठान, पुणे.

---

**✻ दुबई करांची अभिव्यक्ती**

-: सहभाग :-

१. श्री. गणेश पोटफोडे

२. श्री. राजन तावडे

३. सौ. चैत्राली जानेफाळकर

४. ग्रंथ तुमच्या दारी यु ए. ई. - सौ. सुजाता भिंगे, श्री. विनायक रानडे

**✻ समारोप :**

**✻ चहापान :**

**✻ विविध कार्यक्रम :**

-: सहभागी वक्ते :-

१. सौ.स्वाती सुरंगळीकर : कविता

२. सौ. आसावरी डोळे : गीत गायन

३. सौ. मधुवंती तांबट : गीत गायन

४. सौ. शुभदा तांबट : पसायदान

**✻ गीत रामायण**

सादरकर्ते : आकार संस्था

मार्गदर्शिका : सौ. चित्रा देशपांडे

**सूत्रसंचालन : अरुंधती सुभाष डुंबरे**

# ८ वे मराठी विश्व साहित्य संमेलन, दुबई ९ सप्टेंबर २०१८

## ✻ संमेलनाचे मानकरी ✻

अध्यक्ष



**एअरमार्शल भुषण गोखले**
(PVSM)

उद्घाटक



**सुरेश खोपडे**
विशेष पोलिस महानिरीक्षक
(निवृत्त)

कार्याध्यक्ष



**कॅ. निलेश गायकवाड**

निमंत्रक



**डॉ. संदीप कडवे**

## मागील संमेलन अध्यक्ष



विजय कुवळेकर



निनाद बेडेकर




डॉ. विनय सहस्त्रबुध्दे




डि. एस. कुलकर्णी



श्याम जाजू



संजय आवटे



डॉ. तात्याराव लहाणे

## ✻ मान्यवर ✻



हरीश केंची



पराग पोतदार



चित्रा देशपांडे



राजेश बक्षी



विनायक रानडे

निवेदक



अरुंधती डुंबरे

आयोजक



प्रमोद गायकवाड

आयोजक
**शिवसंघ युवा प्रतिष्ठान**
केतकी बिल्डिंग, अलका टॉकिजशेजारी,
डेक्कन, पुणे-३०. फोन : ०२०२४३२१४३०

## संपादकीय



# संरक्षण – नवा दृष्टिकोन

– डॉ. संदीप कडवे

शिवसंघ प्रतिष्ठान आयोजित ८ वे विश्व मराठी साहित्य संमेलन या वेळी दुबईत आयोजित होत आहे. भूतान मध्ये झालेल्या सहाव्या संमेलनात मी सामील झालो होतो व तिथे विश्व पांथस्थ मासिकाचे पुनर्प्रकाशन देखील झाले होते. या उपक्रमात सामील असलेल्या जवळपास सर्वांशीच संवाद साधण्याची संधी त्यावेळी मिळाली होती. आयोजक व संमेलनार्थी दोघांचाही उत्साह वाखाणण्यासारखा आहे. कॅप्टन श्री निलेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली या संमेलनाचे ८ वे यशस्वी आयोजन दुबईत होत आहे या बद्दल शिवसंघ प्रतिष्ठान चे मनापासून अभिनंदन व या संमेलनाच्या यजमानपदाचा मान दुबईस मिळाला याबद्दल त्यांचे खूप आभार.

या संमेलनात मागील संमेलनाचा आढावा घेणारी स्मरणिका प्रसिद्ध होत आहे व रूढ परंपरेला आधुनिक करत ही स्मरणिका विश्व पांथस्थ मासिकांचा विश्व मराठी साहित्य संमेलन विशेषांक म्हणून प्रसिद्ध होत आहे. विश्व मराठी साहित्य संमेलनात सामील होणारे सर्वच जण विश्व पांथस्थ च्या विचारांचे, तत्वज्ञानाचेच पुरस्कर्ते आहेत, म्हणून हा एक समान धागा आपल्या दोघांना जोडतो. या प्रवासात विश्व पांथस्थ परिवाराला सामील करून घेतल्याबद्दल किंबहुना विश्व पांथस्थ परिवारात सहभागी झाल्याबद्दलही आपणा सर्वांचे हार्दिक अभिनंदन व आभार.

ग्रंथ तुमच्या दारी हा उपक्रम आपण भारताबाहेर प्रथमच दुबईत २०१५ साली चालू केला व त्याचा आता जगभर विस्तार झाला आहे. ग्रंथ तुमच्या दारी च्या अनेक समन्वयकांचे, देणगीदारांचे, वाचकांचे या प्रवासात अत्यंत मोलाचे सहकार्य मिळाले. मराठी साहित्याशी निगडित मैलाचा दगड ठरावा अश्या या उपक्रमाच्या यशात भागीदार असलेल्या सर्वांचे, विशेषतः या कल्पनेचे जनक व पालक श्री विनायक रानडे यांचेही यानिमित्ताने अभिनंदन. ग्रंथ परिवाराचा देखील या संमेलनात सक्रिय सहभाग आहे.

या संमेलनाचे उद्घाटक व प्रमुख पाहुणे परम विशिष्ट सेवा मेडल (PVSM) ने सन्मानित एअर मार्शल श्री भूषण गोखले व राष्ट्रपती पारितोषिक विजेते माजी पोलीस महानिरीक्षक श्री सुरेश खोपडे यांचेही दुबईत या संमेलनात स्वागत. या मान्यवरांचे विचार यानिमित्ताने आपल्या सर्वांना ऐकायला मिळणार आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

मराठी साहित्य संमेलनाचा विषय संरक्षणाशी निगडित आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात राजनीती व युद्धनीती याबद्दल विस्ताराने लिहिले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचा अभ्यास जगभरातील अनेक देश करतात. स्वातंत्रवीर सावरकरांनी देशाच्या सार्वभौमत्वाबद्दल, संरक्षणाबद्दल व देशातील नागरिकांच्या चारित्र्यसंवर्धनबद्दल अनेक विचार मांडले आहेत. त्यानंतरही या क्षेत्रातील मान्यवरांनी याबाबत आपले विचार मांडले आहेतच. एक सामान्य नागरिक, एक सामान्य अप्रवासी भारतीय व या विश्व पांथस्थ या उपक्रमाचा/ संकल्पनेचा एक पालखीधारी या भूमिकेतून मला काही गोष्टी या ठिकाणी मांडायच्या आहेत. विश्व मराठी साहित्य संमेलन असल्याने व अशा संमेलनात असे विचार मांडले जावे, ऐकले जावे, त्यावर मंथन व्हावे असा प्रघात असल्याने, माझे विचार येथे मांडणे मी आयोजकांची परवानगी घेऊन प्रस्तुत करत आहे.

स्वतंत्र्य भारताचा ७२ वा स्वातंत्र दिन नुकताच साजरा झाला. हि आनंदाची गोष्ट होती. दुसऱ्याच दिवशी स्वतंत्र भारताचे तीन

वेळा पंतप्रधान असलेले मा अटलबिहारी वाजपेयी यांचा स्वर्गवास झाला. अटलजींना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यानंतर लागलीच संपूर्ण केरळ राज्यात महापुराने प्रलय घडवला, मोठे नुकसान झाले. याच दरम्यान भारतीय चलनाचे अजून अवमूल्यन होऊन अमेरिकन डॉलर च्या तुलनेत रुपया ७० रुपयांपेक्षा जास्त घसरला. या घटना जनमाणसावर खोल प्रभाव टाकून गेल्या. विशेषतः अनिवासी भारतीयांवर. म्हणूनच अनिवासी भारतीयांच्या दृष्टीकोनातून निकोप , समृद्ध व समर्थ भारताच्या काय कल्पना आहेत त्याचा इथे आढावा घेत आहोत.

स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशाचा शत्रू कोण आहे याची व्याख्या बरीच सोपी होती. रणांगणातील लढाई हा शत्रूचा पराभव करण्याचा लोकमान्य व राजमान्य मार्ग होता. नंतर ही लढाई अहिंसेने लढली गेली, तरी सशस्त्र लढाई देखील आझाद हिंद सेनेने लढलीच. स्वतंत्र भारतात अशी सशस्त्र लढाई देशाबाहेरील शत्रूविरुद्ध जरूर लढली गेली. देशांतर्गत नक्षलवादी, अतिरेकी, देशद्रोही यांच्या विरोधात देखील ही लढाई लढली गेली, अजून चालूच आहे. आता लढाईचे मार्ग बदलले. शत्रूची व्याख्या बदलली. सर्वसामान्य माणसाला आता अनेक शत्रू निर्माण झाले आहेत. शत्रू ओळखावा कसा असा संभ्रम निर्माण झाला आहे. समाजातील अनेक घटकांचे झालेले वैचारिक, राजकीय, धार्मिक, अध्यात्मिक, कौटुंबिक, मानसिक व चारित्रिक अधःपतन व त्यामुळे जागोजागी बोकाळलेला भ्रष्टाचार यांच्याशी सर्वसामान्य माणसाने कसे लढावे असा यक्षप्रश्न पडला आहे. राजकीय, सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक गुंडगिरीपासून स्वसंरक्षण कसे करावे हा प्रश्न पडला आहे. सामान्य माणसाला विरोधासाठी शस्त्र उचलता येत नाही, समाजाचे, कुटुंबाचे, व्यक्तीचे मूलभूत अधिकार हिरावून घेऊन त्यांचे शोषण करणाऱ्या गुंडांना, बांडगुळांना , भ्रष्टाचाऱ्यांना सरसकट गोळ्या घालता येत नाही. कायद्याने त्याला बंदी आहे. पण हाच कायदा मग या सामान्यांचे अशा अंतर्गत शत्रूंपासून योग्य वेळी, योग्य प्रकारे रक्षण करतो का? नसेल तर मग याला उपाय काय? समाजधुरीणांनी, विचारवंतांनी, न्यायपालिकेने यावर गंभीर विचार करण्याची गरज आहे.

देशाबाहेर जाणाऱ्या भारतीयांना त्या त्या देशातील न्यायपालिकेच्या अधिकार कक्षात राहून त्या त्या देशात निवास करावा लागतो. प्रसंगी कठोर शिक्षेला सामोरे जावे लागते. परंतु येथेही अनिवासी भारतीयांचे विदेशात होणाऱ्या शोषणापासून रक्षण कोण करणार हा मुद्दा राहतोच. मुळातच अनिवासी भारतीय हा राजकीय पटलावर एक महत्वाचा मुद्दा आहे का असाही प्रश्न विचारावासा वाटतो. त्याला कारणही तसेच आहे.

स्वातंत्र्य मिळून ७२ वर्षे झाली तरी अनिवासी भारतीयांना अजून मतदानाचा हक्क मिळाला नाही. लोकशाहीच्या आर्थिक उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे हे कुणीच अमान्य करत नाही, परंतु त्यानुसार त्यांना लोकशाहीत संपूर्णपणे सामावून घेतलेले नाही ही देखील एक खंत सर्वसामान्य भारतीयांच्या मनात आहे. मराठी भाषिक अनिवासी भारतीय जगभर गेले. त्यांनी अतिशय सन्मानाची पदे परराष्ट्रात भूषवली. आखातातही त्यांनी आपले आगळे वेगळे स्थान निर्माण केले. आज सोशल मेडिया च्या माध्यमातून असंख्य मराठी ग्रुप्स फेसबुक, व्हाट्स एप वगैरे च्या माध्यमातून एकमेकांशी संपर्क ठेवून असतात, एकमेकांना मदत करतात. भारतीय दूतावास किंवा कॉन्सुलेट पेक्षाही या गैरसरकारी ग्रुप्स मधून विविध मराठी भारतीय आसरा शोधत आहेत, आपापली संस्कृती जपत त्या त्या देशांच्या संस्कृतीचाही मान राखत चांगले ते आत्मसात करण्याचा स्तुत्य प्रयत्न करत आहेत. मराठी भाषा संवर्धनासाठी अनेक उपक्रम राबवत आहेत. २०१५ साली ग्रंथ तुमच्या दारी या अशाच एका उपक्रमाची इथे सुरूवात झाली व त्यास सर्वांचाच उत्तम प्रतिसाद मिळाला. नाटक, संगीत हा मराठी भाषिकांचा व्यक्त होण्याचा आवडता मार्ग. आज पूर्वाश्रमीचे महाराष्ट्र मंडळ लयाला गेले असले तरी नव्या स्वरूपात इव्हेंट मॅनेजमेण्ट कंपनी च्या स्वरूपात अनेक नवीन ग्रुप्स संगीत, नाटक व काही धार्मिक कार्यक्रम राबवतात. परंतु २००४ साली गल्फ मराठी बिझनेस फोरम (GMBF) ची स्थापना करून गेल्या १४ वर्षात बिझनेस संबंधी देखील अनेक उपक्रम राबवले गेले. अनेकांना नोकरी सोडून उद्योजक होण्यास प्रवृत्त केले गेले व मदत देखील केली गेली. आज यु ए इ मध्ये अनेक मराठी उपाहारगृह आहेत त्यांना सुरवातीला मदत व प्रोत्साहन देण्याचे काम देखील GMBF ने केले. सोशल मेडिया वर आधारित आमी, दुबई मराठी महामंडळ, मराठी इन दुबई, मराठी इन यु ए इ वगैरे अनेक ग्रुप्स कार्यरत आहेत, जे विखुरलेल्या मराठी माणसांना एकत्र आणण्याचे काम करत आहेत. अबू धाबी, रस आलं खेमाँ, अल ऐन येथील मंडळे जुनी आहेत व त्यांनी देखील यात मोलाचे कार्य केले आहे. २०१६ मध्ये विश्व पांथस्थ या अनिवासी भारतीयांसाठी मराठी भाषेतून प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या मासिकाचे प्रकाशन सुरु झाले व अनेक नवोदित लेखक, कवी, वाचक यांना व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ मिळाले. १९७२ मध्ये यु ए इ स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयाला आले, त्या पूर्वीपासून मराठी माणसाचे यु ए इ च्या प्रगतीत मोलाचे योगदान आहे. कित्येक कुटुंबांच्या २-३ पिढ्या दुबईत कार्यरत आहेत. या सर्वांनी गेल्या अनेक दशकात रेमिटंसेस च्या द्वारे किमान १ लाख करोड रुपये महाराष्ट्रात पाठवले आहेत व त्याद्वारे महाराष्ट्राच्या प्रगतीत देखील अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. इतके भरीव कार्य करणाऱ्या अनिवासी भारतीयांच्या कामगिरीची महाराष्ट्राच्या इतिहासात योग्य ती दाखल घेतली जावी अशीच येथील सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. मतदानाचा हक्क हा केवळ त्यातील एक भाग झाला.

परंतु गेल्या २० वर्षात आखातात विशेषतः दुबईत अमूलाग्र बदल झाले आहेत. खढ चा वापर करून येथील सरकारने efficient governance कसे असावे याचा एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला

आहे. केवळ गगनचुंबी इमारती नाही तर एकंदरीतच सर्व पायाभूत सोयीसुविधा, मोठे मॉल, हॉस्पिटल्स, एअर पोर्ट्स, सी पोर्ट, हायवे, शाळा, कॉलेजेस, युनिव्हर्सिटी, मेट्रो, ट्राम, सर्व वाळवंटातून उभे केले. त्यातही मराठी माणसाचा काही ना काही सहभाग आहेच. त्या अनुभवाचा महाराष्ट्राला फायदा व्हावा व त्यादृष्टीकोनातून अशा अनेक मराठी भारतीयांना मायभूमीतील अनेक उपक्रमात सामील करून घ्यावे.

सोशल नेटवर्किंग फोरम च्या माध्यमातून श्री प्रमोद गायकवाड महाराष्ट्रात अनेक प्रकल्प राबवत आहेत. अनेक दुर्गम भागातील गावांचा पाणीप्रश्न त्यांनी या माध्यमातून सोडवला आहे. त्यांचे हे कार्य फार मोठे आहे. यातही दुबईतील वा आखातातील मराठी लोकांनी केवळ आर्थिक नव्हे तर प्रत्यक्ष सामाजिक सहभागातून मदत करावी असेही आवाहन या निमित्ताने आखाती मराठी बंधुभगिनींना विश्व पांथस्थाच्या माध्यमातून करत आहे.

असे सहकार्य केरळी लोकांनी केरळ राज्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर केले व त्यातूनच एक साक्षर, समृद्ध केरळ राज्य उभे राहिले. आता आलेल्या नैसर्गिक आपत्तीतून केरळ पुन्हा एकदा लवकरच सावरेल व त्यात अनिवासी भारतीयांचा मोठा सहभाग असेल यात मला तरी शंका नाही.

रुपयाच्या अवमूल्यनाने जरी अनिवासी भारतीयांना दर्शनी फायदा दिसत असला तरी एकंदरीतच यु ए इ तील किंवा आखातातील अर्थव्यवस्था एका संक्रमणातून जात असल्याने व नोकरी धंद्यावर त्याचा अनिष्ट परिणाम दिसत असल्याने NRI ची मिळकतच कमी झाली आहे, सेविंग देखील कमी झाले आहे. येथील कॉस्ट ऑफ लिविंग खूपच वाढली आहे. त्यामुळेही बहुसंख्य NRI अगतिक अवस्थेत आहेत याची महाराष्ट्रातील जनतेला कल्पना नसेल. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या जशा होतात, तशाच NRI च्या देखील आत्महत्त्या होतात हि एक भीषण वस्तुस्थिती आहे. परंतु त्याचा राजकीय फायदा नसल्याने मीडियात फारसा गाजावाजा होत नाही. अनेक कारणांमुळे भारतात परतण्याची इच्छा असणाऱ्या NRI साठी विश्व पांथस्थ तर्फे एका मंचाची स्थापना करण्यात येणार आहे. त्यात भारतातील व महाराष्ट्रातील धुरिणांनी सहभागी व्हावे असे आवाहन या निमित्ताने करतो.

देशाचे संरक्षण हा विषय आता देशाच्या सीमांचे संरक्षण एवढ्या पुरता मर्यादित राहिला नाही. जगभर पसरलेल्या भारतीयांच्या हक्कांचे संरक्षण देखील यात समाविष्ट आहे. भारतातील प्रत्येक नागरिक जर आर्थिक, सामाजिक, मानसिक व शारीरिक रित्या सशक्त झाला तर आपोआपच देश समृद्ध व सशक्त होईल यात शंका नाही. आखातातील भारतीय व जगभर पसरलेले NRI हे अनेक आव्हानांचा सामना करत स्वतःला, कुटुंबाला, आपल्या गावाला, राज्याला व पर्यायाने देशाला आहे प्रकारे समृद्ध व सशक्त करीत आहेत. अशा स्वयंपूर्ण, देशप्रेमी, संस्कृतीप्रेमी व तन–मन–धनाने भारतीय असलेल्या NRI च्या वतीने ८ व्या विश्व मराठी साहित्य संमेलनाला अनेक शुभेच्छा देतो. भविष्यात मराठी साहित्यात NRI चे अनुभव देखील लेख, कादंबरी, कविता, नाटक व संगीताच्या रूपाने सामील होऊन मराठी साहित्य विश्वात मोलाची भर घालतील अशी विश्व पांथस्थ तर्फे अपेक्षा व्यक्त करतो.





# सातत्य पूर्ण साहित्य यज्ञ

– प्रमोद गायकवाड
आयोजक,आठवे विश्व साहित्य संमेलन, दुबई

सातत्य हे कोणत्याही यशाचे खरे गमक आहे हे शिवसंघ प्रतिष्ठानने गेल्या ८ वर्षात सिद्ध करून दाखवले आहे. आजवर मराठी विश्र् साहित्य संमेलनांचे अनेक प्रयत्न झाले असतील पण २०१० साली अंदमान येथे सुरु झालेला शिवसंघाचा हा साहित्य यज्ञ गेली ८ वर्षे अखंड, अविरत चालू आहे. जगभरातील मराठी रसिकांचाही या संमेलनांना उदंड प्रतिसाद लाभत आहे. दरवर्षी अनेक देशातील मराठी बांधवांकडून संमेलन घेण्याची विनंती केली जाते. त्यातील एका देशात आपण हे संमेलन घेतो . या परंपरेतच यावर्षी ८ वे मराठी विश्व साहित्य संमेलन दुबई येथे होत आहे याचा आम्हाला विशेष आनंद होत आहे. यानिमित्ताने अंदमानपासून दुबई पर्यंतच्या साहित्य प्रवासाचा हा लेखाजोखा...

**अंदमान :२०१०**

ज्या अंदमानात स्वा. सावरकरांनी मरणप्राय यातना भोगल्या त्याचा भूमीमध्ये कॅप्टन निलेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून प्रथम संमेलन भरवणे शिवसंघ प्रतिष्ठानला उचित वाटले म्हणून २०१० साली पहिले स्वा.सावरकर साहित्य संमेलन पार पडले ते थेट अंदमान येथे. या समेलनाचे अध्यक्ष मा.विजय कुवळेकर यांच्या अनुभवी नेतृत्वाखाली संमेलन छान पार पडले. आणि स्वा.सावरकर यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या पवित्र जागेला भेट देण्याची जी सावरकर प्रेमींची आतुरता दिसली त्यातूनच १ लाख सावरकर प्रेमींना अंदमान दर्शन घडवण्याची संकल्पना उदयास आली. स्वा. सावरकरांच्या स्मृती मनात जागवत असतानाच भारताच्या सर्वात सुंदर भागाची सफर घडवण्यात येते. आशियातला सर्वात सुंदर बीच, कोरल्स, स्नोर्कलिंग, प्रेक्षणीय समुद्रकिनारे यांची अविस्मरणीय भेट आपल्याला मिळते.

**श्रीलंका २०१२ :**

त्यानंतरचे संमेलन भरवले गेले ते निळ्याशार समुद्राने वेढलेल्या श्रीलंका या सुंदर देशात. सुप्रसिद्ध इतिहासकार श्री. निनाद बेडेकर यांच्यासारखा अभ्यासू आणि जाणता अध्यक्ष या संमेलनाला लाभला आणि हे देखणे संमेलन सुरळीत पार पडले. मा. हिमानीताई सावरकर, मा. श्री विजय कुवळेकर यांचे मार्गदर्शन आणि शिवसंघ प्रतिष्ठानची यशस्वीतेसाठी झटणारी टीम यांनी हा दिमाखदार सोहळा यशस्वी केला. प्रभू रामचंद्र यांच्या पाऊलखुणा उमटलेली ही भूमी ज्यावर रामायणातल्या सर्व खुणा अजूनही जपून ठेवल्या गेल्या आहेत. श्रीलंकेतील हे जिवंत रामायण पाहताना आपल्या पुरातन संस्कृतीचा अभिमान वाटल्या वाचून राहत नाही.

**नेपाळ : २०१३**

मराठी साहित्याचा गजर हिमालयाच्या कुशीत झालाच पाहिजे या विचारातून तिसरे संमेलन भरले ते नेपाळ मध्ये. मा.श्री. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेले हे नेपाळ संमेलन चिरस्मरणीय ठरले. सहस्त्रबुद्धे सरांनी आपल्या अतिशय मौलिक विचारांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. हिमालयाच्या बर्फाच्छादित कड्यांना पदस्पर्श करत तिथल्या निसर्गमय पर्वतशिखरांना भेट देणे सुखावह ठरले. आणि या संमेलनाच्या असलेला सर्वांचा सहभाग पाहता सर्व सावरकर प्रेमींचे शिवसंघ प्रतिष्ठानवरचेही प्रेम दिसून आले.

**थायलंड : २०१४**

थायलँडच्या रमणीय बेटावर सागराच्या सान्निध्यात पार पडलेल्या चौथ्या संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले मा.श्री.डी. एस.कुलकर्णी यांनी. डीएसके यांच्या अध्यक्षतेखाली, मा.हिमानी ताई सावरकर यांच्या प्रेरणेने आणि शिवसंघ प्रतिष्ठानच्या नेटक्या आयोजनाने हा सोहळा अगदी भव्य दिव्य झाला. त्यानंतर थायलँड भूमीवर असलेल्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी, आणि डोळ्याचे पारणे फेडणारा सुप्रसिध्द अल्कझार शो, पॅरासेलिंगचा थरारक अनुभव यांनीही थायलँड भेट कायमची स्मरणात राहिली.

**मॉरिशस : २०१५**

पाचवे संमेलन भरविण्याचा मान मिळाला तो पाचूच्या बेटाला म्हणजेच मॉरिशसला. या पाचुच्या बेटावर असीम शांतीचा अनुभव घेत, निसर्गाच्या आणि सागराच्या साक्षीने आपण पुन्हा एकदा जमलो ते स्वा. सावरकरांच्या साहित्याचा जयघोष करण्यासाठी. यावेळी या जयघोषात सूर मिसळले होते अध्यक्ष मा.शाम जाजू यांचे. त्यांच्या मार्गदर्शनाने आणि प्रेरणेने, शिवसंघ प्रतिष्ठानच्या अथक परिश्रमाने संमेलन यशस्वीरीत्या पार पडले. छोट्याश्या परंतु नयनरम्य देशाची सफर स्वच्छ समुद्रकिनारे,सी वॉक,समुद्र तळाचे दर्शन यासर्व गोष्टींमुळे ही एक अनोखी सफर ठरली.

**भूतान : २०१६**

सहावे साहित्य संमेलन भारताचेच एक राज्य वाटावे अशा भूतान देशात झाले. जगातील सर्वात आनंदी देश असा नाव लौकिक मिळवलेल्या भूतान संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ पत्रकार श्री.संजय आवटे यांनी भूषविले. संजयजींच्या सडेतोड विचारमंथनासोबतच इतिहास आणि सामाजिक सुधारणांचे पुरस्कर्ते श्री. हरी नरके यांच्या भाषणानेही उपस्थितांची माने जिंकली. नैसर्गिक साधनांनी ओतप्रोत भरलेल्या आणि गोंगाट प्रदूषणापासून कोसो दूर असलेली थिंपू, पारो शहरे आणि तिथल्या मनाला शांती देणाऱ्या बुद्ध देवालयांना भेटी देऊन आत्यंतिक समाधानाने सर्व साहित्य रसिक भारतात परतले.

**बाली : २०१७**

इंडोनेशयाचे नयनमनोहर बेट बाली येथे शिवसंघाचे सातवे विश्र् मराठी साहित्य संपन्न झाले. बाली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने उपस्थित राहिले. त्यांच्या शैलीदार भाषणाने संमेलनात रंगात भरली. त्यांच्याबरोबरच मागील संमेलनाचे अध्यक्ष संजय आवटे आणि संमेलनाचे उदघाटक निवृत्त महापालिका आयुक्त श्री.जिवन सोनवणे यांनीही उपस्थित श्रोत्यांना संबोधित केले. बाली बेटावरील अनके प्राचीन हिंदू मंदिरे आणि नायनाट सुंदर समुद्र किनाऱ्यांना भेटी देऊन संमलेन यशस्वीरित्या पार पडले.

अशाप्रकारे दरवर्षी आपण शिवसंघ प्रतिष्ठानच्या माध्यमातून मराठी विश्व साहित्य संमेलन एक वैश्विक प्रयोग म्हणून करत असतो आणि त्यात आपला सर्वांचा सहभाग आवर्जून असतो. प्रदेशात एखादा कार्यक्रम आयोजित करणे आणि तो एवढ्या सामर्थपणे याश्वूरीत्या पार पडणे हे खरे तर एक आव्हानच असते. परंतु आपण सर्वांनी शिवसंघ प्रतीष्ठानवर ठेवलेल्या विश्वासामुळे हे महान कार्य साध्यही होऊन जाते आणि पुढील वर्षाच्या कार्यक्रमासाठी बळ मिळते.

****

---

# वैद्यकिय विश्वाचा प्रसार मराठी माध्यमातून

कुठल्याही क्षेत्रात स्वतःच्या प्रकटीकरणाचं साधन म्हणजे 'भाषा' भाषे शिवाय व्यक्तताकठीण संवादाचा सर्वात प्रभावी भाग म्हणजे भाषण.

वैद्यक व्यवसाय त्याला अपवाद कसा ठरावा ? वैद्यकाची मुळ भाषा सर्वभाषांची जननी 'संस्कृत'. चरक आणि सुश्रृताची सर्व वचने संस्कृतमधील.

आजही कित्येक अद्ययावत गोष्टींचा संदर्भ चरक आणि सुश्रृताच्या त्यावेळच्या श्लोकात सापडतो.

आधुनिक वैद्यकाची (Modern Medicine) ची मुळ भाषा 'लॅटिन' पण कालौघात अस्तंगत पाहून त्याची जागा इंग्रजीने घेतली कारण ती सर्वत्र वापरली जाणारी व्यवहाराची, व्यवसायाची, व्यापाराची भाषा होती.

आमची मातृबोली, 'मायमराठी' सर्वत्र बोलली लिहिली जाणारी कोसाकोसावर आपले अलंकार बदलणारी समृद्ध मराठी.

वैद्यक व्यवसायातही तिचं महत्व अनन्य साधारण. आज कित्येक पुस्तकं मराठीत सामान्य माणसांच जीवन समृद्ध करत आहेत. कित्येक इंग्रजी शद्बांना आज मराठीत प्रतिशद्ब उपलद्ब आहेत. मराठीत आज वेगवेगळी नियत कालीक (Journal's) निघता आहेत.

माहितीच्या मायाजालामुळे (Internat) ती जगभर पोहचत आहेत. वैद्यकिय विश्वाच्या कक्षा मराठीच्या माध्यमातुन रूंदावत आहेत.

Diabetes (मधुमेह), Hypertention (उच्चरक्तदाब) या सारख्या विषयांवर सामान्यांना समजेल अशी विपुल ग्रंथ संपदा उपलब्ध आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसांना आरोग्य विषयक सजगता येण्यात मदत होते.

गर्भ संस्कारांसारख्या गोष्टिंच महत्व यापुर्वी सिद्ध झालं आहे. त्याखेरीज वैद्यकीय व्यवसायीकांच्या आत्मवृत्तांनी व्यवसाया बद्दलचे अपसमज दुर होण्यास मदत होते आणि होत राहिल.

शेवटी जी भाषा व्यवसायाची व्यापाराची होते तीच टिकते. नसत्या अलंकारिकतेचे फुलोरे तिला शाश्वत बनवत नाहीत हे सार्थ विचार तात्यारावांचे विनायक दामोदर सावरकरांचे.

****




# मराठी संवर्धन आपल्याच हातात !



**– कॅप्टन निलेश गायकवाड**

स्वागताध्यक्ष विश्व मराठी साहित्य संमेलन २०१८, दुबई.

मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे असं म्हंटलं जायचं ! त्यानंतर ती राजभाषा झाली परंतु त्यालाही आता बरीच वर्षे झाली. मराठ्यांचं राज्य अटकेपार गेलं , त्यावेळी सबंध भारतातल्या पहिल्या तीन भाषांमध्ये मराठीचं स्थान बळकट होतं. आपण म्हणतो मराठी भाषिक लोक फक्त महाराष्ट्रातंच राहतात परंतु तसे नाही.. तर महाराष्ट्राच्या आजूबाजूच्या कर्नाटक,गोवा, गुजरात, छत्तीसगढ व तेलंगाना सारख्या राज्यांबरोबरच हरियाणा , पंजाब, उत्तर प्रदेश बंगाल आदि राज्यांमध्ये देखील मराठी भाषा जाणणारे आणि बोलणारे लोक आहेत. फक्त भारतातच नाही तर भारताबाहेर इतर अनेक देशांत मराठी लोक आपली पाळं-मुळं रोवून आहेत. या सर्व जगभरात विखुरलेल्या मराठी बांधवांना जोडण्यासाठी आम्ही विश्व मराठी परिषदेची स्थापना केली.

मराठी भाषेचा साहित्यातील आवाका जेवढा मोठा , तेवढीच तिची खोली देखील अधिक ! या आपल्या भाषेचा , तिच्या वृद्धीचा विचार करून व मराठी भाषेला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी शिवसंघ प्रतिष्ठानच्या सहकार्याने आम्ही विश्व मराठी परिषदेच्या माध्यमातून गेली सहा वर्षे वैश्विक स्तरावर मराठी साहित्य संमेलन आयोजित करत आहोत.

आजवर अंदमान, श्रीलंका, थायलंड, नेपाळ, मॉरीशस, भूतान आणि इंडोनेशिया येथील बाली येथे ही संमेलने झाली असून संमेलनातील हे आठवे पुष्प म्हणून हे संमेलन युनायटेड अरब अमेरात येथील दुबई येथे आपण आयोजित करण्यात केले.

यंदाच्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचा विषय हा भारताचे संरक्षण व अंतर्गत सुरक्षा हा असून या वेळी अध्यक्ष म्हणून या संमेलनाला संरक्षण क्षेत्रातील एक श्रेष्ठ व्यक्तिमत्व निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले हे लाभले.

या पूर्वीच्या संमेलनांना स्व. श्री. निनाद बेडेकर, श्री. विनय सहस्रबुद्धे, श्री. विजय कुवळेकर, श्री. डी. एस. कुलकर्णी, श्री. शाम जाजू व डॉ. तात्याराव लहाने आदींनी अध्यक्षपद भूषवलेले आहे.

मराठी भाषा ही जागतिक स्तरावर नावाजली जावी , ती व्यवहाराची भाषा बनावी त्या अनुषंगाने काम करण्याचा आमचा सतत प्रयत्न असतो. त्याचबरोबर मराठी साहित्याची व्याप्ती ही केवळ मराठी कथा , कादंबरी, ललितलेखन एवढीच मर्यादित न राहता तिची व्याप्ती वाढावी यासाठी विश्व मराठी परिषदेचा प्रयत्न असतो.

अनेक ठिकाणी जी साहित्य संमेलने होतात , त्यांचा विषय फक्त मराठी साहित्यातील लेखन हा असतो. त्यामुळे इतर विषयावरील लेखन हे मागे पडते किंबहुना त्याला हवी ती प्रसिद्धी मिळत नाही. मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार जर जागतिक पातळीवर करावयाचा असेल , तर तिला कथा , कविता, कादंबरी आणि ललित लेखन एवढं मर्यादित करून चालणार नाही. तिला व्यावहारिक पातळीवर आणणे गरजेचे आहे. हे लक्षात आल्यामुळे आणि मराठी साहित्याला एक वेगळा आयाम मिळावा ह्या दृष्टीने या संमेलनास दर वर्षी एक वेगळे सूत्र देण्यात येते, आणि संमेलनाच्या सूत्राला अनुसरून त्या क्षेत्रातील एक विशेष तज्ञ या संमेलनाचे अध्यक्ष पद भूषवित असतो.

मराठी साहित्य हे अफाट आहे त्यामुळे विविध क्षेत्रातील विषयाला अनुसरून लिहिलेल्या मराठी साहित्याला देखील योग्य न्याय मिळावा यासाठी गेल्या २ वर्षापासून हे संमेलन विषयकेंद्रीत केले गेले. वैद्यकीय क्षेत्रातील लेखन हा मागील वर्षीचा संमेलनाचा विषय होता. मागील वर्षी या संमेलनाला त्या क्षेत्रातील लेखकांचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला आणि त्या लेखनाला देखील एक व्यासपीठ

मिळाले.

हा प्रतिसाद पाहता या वर्षीच्या संमेलनाचा विषय भारताचे संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षा हा असणार आहे. म्हणून ह्या वर्षीचे संमेलनाध्यक्षाचे अध्यक्षपद हे संरक्षण क्षेत्राशी संबंधित वरिष्ठ अधिकारी एअर मार्शल निवृत्त श्री. भूषण गोखले हे भूषविणार आहेत हे संमेलनाचे भाग्य ! तसेच उद्घाटक म्हणून संरक्षण क्षेत्राशी संबंधित पोलिस महासंचालक निवृत्त श्री. सुरेश खोपडे हे लाभले आहेत.

संरक्षण खात्यात देशासाठी आयुष्य वाहिलेल्या एका थोर व्यक्तीने या वर्षीच्या संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारल्याने या संमेलनाची उंची अजून वाढली आहे यात तिळमात्र शंका नाही .

मागील वर्षी झालेल्या बाली येथील संमेलनानंतर इतर सहा ठिकाणाहून या संमेलनासाठी आमंत्रण आले असता या वर्षी युनायटेड अरब एमेरात येथील दुबई येथे हे संमेलन निश्चित केले गेले.

मागील वर्षी या संमेलनाचा केंद्रबिंदू वैद्यकीय क्षेत्रातील लेखन असल्याने ह्याच विषयावर परिसंवाद व चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. त्यात वैद्यकीय क्षेत्राशी जोडल्या गेलेल्या अनेक व्यक्तींचा उत्तम प्रतिसाद लाभला. एका विशिष्ट विषयाला वाहिलेल्या साहित्य संमेलनाचा प्रयत्न यशस्वी ठरल्याने याही वर्षीच्या संमेलनाला एक सूत्र असावे, असा प्रयत्न विश्व मराठी परिषदेणे केला.

यचपुढे देखील मराठी भाषेतून विविध ज्ञान शाखांमध्ये अध्ययन , संशोधन , लेखन केले जाते. वैद्यक , वाणिज्य, व्यापार , संरक्षण , पर्यावरण, युद्धशास्त्र , अभियांत्रिकी , कौशल्ये, कारागिरी अशा कितीतरी बाबतीत मराठीतून विपुल लेखन केले गेले आहे. या संमेलनाच्या निमित्ताने त्या सर्व क्षेत्रातील प्रतिभावंत, संशोधक, अभ्यासक, लेखक, कल्पक यांना देखील या संमेलनाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे .

देशाची सुरक्षा , सीमेवरील सुरक्षा , सागरी सुरक्षा आणि हवाई सुरक्षा यासंबंधी काम करत असलेल्या विविध कंपन्या , आयुधे निर्माण करणाऱ्या कंपन्या , त्यांचे व्यवहार , संबंधित कायदे , नियम व अधिकार अशा विविध बाबतीत सतत लेखन , विचार , चर्चा होत असते. त्याचीही व्यापक दखल या निमित्ताने घेतली जाणार आहे.

या संमेलनातील परिसंवादांमध्ये मराठी माध्यमांतील नामवंतांप्रमाणेच अबुधाबी , दुबई येथील ज्येष्ठ विचारवंत , साहित्यिक , कलावंत व लेखक सहभागी होत आहेत.

जागतिक समुदायाशी मराठी माणसांना जोडणे, जगभरातील मराठी माणसांचे संघटन करणे, मराठी माणसांचे अनुभवविश्व समृद्ध करणे, विविध क्षेत्रांतील अनुभव साहित्यात उमटवणे, जागतिक अर्थव्यवस्थेत मराठी माणूस महत्त्वाचा होणे, मराठी भाषा जागतिक दर्जाची व्हावी, मराठी साहित्य व लेखन हे कथा, कविता , कादंबऱ्या , ललितकथा अशा ललित लेखनापुरतीच मर्यादित न राखता इतरही क्षेत्रातील माहितीपूर्ण लिखाण , ज्ञान प्रगल्भ व्हावे आणि ते लिहिणाऱ्यांना लेखकाचा दर्जा मिळावा, तसेच फक्त साहित्य क्षेत्राशी निगडीत असलेले साहित्यच नाही तर 'साहित्य' ही संकल्पना अधिक व्यापक करत ती समग्र भाषा व्यवहाराशी जोडली जावी यासाठी प्रयत्न करणे या हेतूंसाठी विश्व मराठी परिषद स्थापन झाली आहे व त्या अनुषंगाने कार्यरत आहे.

या संमेलनाच्या निमित्ताने मराठी भाषेला पुनश्च तिचे गतवैभव प्राप्त करून देण्याचा आमचा एक प्रयत्न !!

****





# समृद्धीचे आकर्षण असलेले दुबई ...

– अरूंधती डुंबरे

दुबई, आखातातील देशातील एक महत्त्वाचे शहर ! युनायटेड अरब एमीरात (ण-ए) या देशात दुबई शहर वसलेले आहे. अमीरात या शब्दांचा अर्थ राज्य असा होतो. यु. ए. ई हा सात राज्यापासून बनलेला देश आहे. ही ७ एमिरात म्हणजे अबू धाबी, दुबई, शारजाह, अजमान, उम-अल-क्वैन, रास-अल-खैमा आणि फुजैराह.

दुबई अमिराती पर्शियन आखाताच्या आग्नेय किनाऱ्यावर अरबी वाळवंटामध्ये समुद्रसपाटीवर वसले आहे. दुबईच्या दक्षिणेला अबु धाबी अमिरात, ईशान्येला शारजा अमिरात तर आग्नेयेला ओमान देश आहेत. दुबई बद्दल आश्चर्य कारक गोष्ट सांगायची म्हणजे दुबईचे मुळ क्षेत्रफळ ३,९९० चौरस किमी (१,५४० चौ. मैल) इतके होते परंतु समुद्र बुजवून येथे अनेक कृत्रिम बेटे बनवण्यात आली आहेत ज्यामुळे दुबईचे आजचे क्षेत्रफळ ४,११० चौरस किमी (१,५९० चौ. मैल) इतके आहे. विशेष म्हणजे दुबईमध्ये कोणतीही नदी नाही.

आकारमानाने अतिशय लहान परंतु मध्य-पूर्व देशांमधील सर्वात प्रगत राष्ट्र म्हणून युएइ चा उल्लेख केला जातो. १९७१ मध्ये दिवंगत राष्ट्रपती शेख झायेद यांनी अविकसीत अशी आजुबाजुची राज्ये एकत्र करून युएइ ह्या राष्ट्राची बांधणी केली.

आज पर्यटन आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमुख केंद्र म्हणून युएइचा उल्लेख केला जातो. तसेच जगातील काही अतिप्रगत अशा राष्ट्रांच्या पंगतीत देखील युएइला मानाचे स्थान आहे. तेलाचा लागलेला शोध ही युएइच्या प्रगतीतील जरी प्रमुख बाब असली तरी त्याचा योग्य तो विनियोग करून स्वतःचे स्थान जगातील प्रमुख राष्ट्रांमध्ये आणण्यासाठी त्यांच्या राज्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत खरच कौतुकास्पद आहे.

शेख झय्यद बिन सुलतान अल नहान (अबुधाबीचे तत्कालीन राजे) आणि शेख रशिद बिन सईद अल मक्तुम यांच्या संकल्पनेतून दुबई, अबुधाबी, शारजा, अजमान, उम-अल-क्वैन, फुजैरहा आणि रास अल खैमाह एकत्र येऊन संयुक्त अरब अमिरात जन्माला आले. अबुधाबीचे शेख झायेद यांनी अमिरातीच्या विकासासाठी अनेक धोरणं आखली. त्यांनी दुबईला एक आंतरराष्ट्रीय ठिकाण म्हणून विकसित करायला सुरुवात केली. त्यासाठी स्वतः तर पैसे गुंतवलेच पण जगभरातील

गुंतवणूक दुबईत आणायला सुरुवात केली. अर्थात या गुंतवणुकीचा परतावा मिळण्यास काही काळ घालवावा लागणार होता. तोच काळ आता संपला असून दुबई हे सर्व प्रकारांच्या पर्यटकांनी ओसंडून वाहत आहे.

दुबईच्या लोकसंख्येपैकी केवळ १०-१५ टक्के लोकच स्थानिक अमिराती वंशाचे आहेत व उर्वरित ८५ टक्के रहिवासी बाहेरून स्थानांतरित होऊन येथे स्थायिक झालेले आहेत. स्थानांतरित लोकांपैकी बहुअंशी लोक आशियाई आहेत ज्यांपैकी ५३ टक्के लोक भारतीय आहेत.

**मराठी भाषिक दुसऱ्या क्रमांकावर !!**

आजमितीला संयुक्त अरब अमिरातीमध्ये एकूण भारतीयांच्या लोकसंख्येच्या तुलनेत मराठी भाषिकांची संख्या दुसऱ्या क्रमांकाची आहे. अरबी ही दुबईमधील राष्ट्रीय व राजकीय भाषा आहे व दैनंदिन वापरासाठी इंग्लिशचा दुसरी भाषा म्हणून उपयोग होतो. येथील बहुसंख्य रहिवासी विदेशी वंशाचे असल्यामुळे हिंदी-उर्दू (किंवा हिंदुस्तानी), फारसी, मल्याळम, पंजाबी, पश्तो, बंगाली, सिंधी, बलुची, तुळू, तामिळ, कन्नड, सिंहला, मराठी, तेलुगू, टागालोग व चिनी इत्यादी भाषा दुबईमध्ये वापरात आहेत.

**हेलिकॉप्टरचा सर्रास वापर**

दुबईत पर्यटनाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची अशी वाहतूक व्यवस्थादेखील अतिशय कौशल्यपूर्णपणे विकसित केली आहे. हेलिकॉप्टरचा वापर हा तेथे अगदी सर्रास केला जातो. प्रत्येक उंच इमारतीच्या छतावर हेलिपॅडची सुविधा आहे. अगदी उबरवरदेखील तुम्ही हेलिकॉप्टर बुक करू शकता. तर सी प्लेन्सचा वापरदेखील अगदी सहजपणे होतो. सर्वसामान्यांसाठी मोनो, मेट्रो, टॅक्सी अशी सर्व सुविधा समांतरपणे विकसित होत



गेली आहे. तर इमिरेटस ही हवाई वाहतूक करणारी यंत्रणा जगभरात प्रतिष्ठेची समजली जाते. जगाच्या कानाकोपऱ्यात इमिरेस्ट एअर लाइन्सची सुविधा देण्यात आली आहे.

**दुबईची खाद्यसंस्कृती –**

कोठेही परदेशात गेले की आपले खाद्यपदार्थ मिळणारी हॉटेल्स मिळाल्यास भारतीय पर्यटक हरखून जातात. उपमा, इडली सांबारपासून अनेक भारतीय खाद्यपदार्थ मिळणारी हॉटेल्स इथे आहेत,

सायबा, पेशवासारखी मराठमोळी हॉटेल्स, हाजी अली ज्यूस सेंटर, पुरनमल, बॉम्बे चौपाटी आहे. संजीव कपूर आणि आशा भोसले यांची हॉटेल्स आहेत. पाकिस्तानी, अरबी, इटालियन अशी भरपूर हॉटेल्स आहेत. दुबईमध्ये भारतीय , पाकिस्तानी , बांगलादेशी , नागरिक जास्त असल्यामुळे येथे तुम्हाला सर्व प्रकारच्या पदार्थांची चव चाखता येऊ शकते. येथे अनेक मॉल्स असल्यामुळे तुम्ही येथे चायनीज , इटालियन , मेक्सिकन पदार्थांची चव चाखु शकता. आळू वडी असो किवां पुरणपोळी तुम्ही जे मागाल ते तुम्हाला येथे मिळणार हे मात्र नक्की.

**सण – उत्सव –**

दुबई हे इस्लामिक राज्य असल्यामुळे इथे रमजान हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. रमजानच्या महिन्याला अनन्य साधारण महत्व आहे. रमजानच्या महिन्यात ईद – उल–फितर , ईद – अल – अदा हे उत्सव देखील साजरे केले जातात . दुबईमध्ये परकीय नागरिक देखील मोठ्या संख्येने राहत असल्यामुळे येथे त्यांचे सण – उत्सव साजरे केले जातात जसे की क्रिसमस , दिवाळी , होळी , गणेश उत्सव , इत्यादी.

**चौफेर विकास : आर्थिक उत्कर्ष !**








आखाती किंवा मध्य पूर्वेकडील संयुक्त अरब अमिरात, ओमान, बहारीन आणि कतार या देशांबद्दल भारतीयांना बऱ्याच वर्षांपासून आकर्षण आहे. तेथे नोकरीधंद्यानिमित्त जाणाऱ्यांचे प्रमाण ७० ते ८० च्या दशकापासून मोठ्या प्रमाणावर वाढले. दुबईचे पर्यटनाच्या नकाशावरचे स्थान एकदम वरच्या क्रमांकात आहे. त्याचं कारण आहे या वाळवंटात मेहनतीने जन्माला घातलेली जणू काही प्रतिसृष्टी. पण हे सारं एका दिवसात झालं नाही. त्यासाठी जाणीवपूर्वक, ठरवून काही गोष्टी केल्या गेल्या. त्यामुळे केवळ पर्यटनच नाही तर बंदर, व्यापारी केंद्र, विविध इव्हेंटसाठीचे उत्तम ठिकाण असा चौफेर विकास या देशाने केला आहे.

दुबईचे भौगोलिक स्थान हा यातला सर्वात महत्त्वाचा घटक. मुळात दुबईत नैसर्गिक असे पुरातन बंदर होतेच. प्राचीन जमाती दुबईत राहू लागल्या तेव्हादेखील बंदर हाच महत्त्वाचा घटक होता. कालांतराने ते बंदर विकसितदेखील झाले, पण अतिवापरामुळे पुढे निकामी झाले. संयुक्त अरब अमिरातीच्या नव्या धोरणांमुळे नव्याने बंदर बांधायला सुरुवात झाली. पण हे बांधताना काही गोष्टी अगदी जाणीवपूर्वक केल्या. दुबईतील नव्याने विकसित केलेल्या सर्वच गोष्टींमध्ये एक मुद्दा मध्यवर्ती राहिला आहे. तो म्हणजे जे करू ते जगातील सर्वात मोठं असेल ही ऊर्मी त्यामागे होती. मग ते बंदर असो, मॉल असो, मत्स्यालय असो की अन्य काही. या जगातील सर्वात मोठं असण्याच्या या उर्मीने एकूणच दुबईला व्यापून टाकलं आहे. न्यू दुबई पोर्ट हे १९९९ मध्ये बांधल्यानंतर ते जगातील मानवनिर्मित असं सर्वात मोठं बंदर ठरले.

# सुरक्षित भारत समृद्ध भारत



– एअर मार्शल भुषण गोखले (PVSM)

**"अनादि मी अनंत मी, अवध्य मी भला**
**मचरिल रिपु जगति असा कवण जन्मला"**

असे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी म्हटले आहे.

स्वातंत्रवीर सावरकरांनी केलेल्या 'सनस्त खड्ग' या संस्कृत नाटकांत एक महत्वाचा परीसंवाद आहे. ज्या राजाने अहिंसेच्या मार्गाची दीक्षा घेतलेली असते, तो आपल्या सेनापतीला सुध्दा तसाच मार्ग स्वीकारयाचा आदेश देतो. तेंव्हा सेनापती त्याला म्हणतो की जर आपण सगळांनीच असा मार्ग स्वीकारला तर आपल्याशत्रू राष्ट्रांनी आपल्यावर हल्ला केल्यास आपण कसे प्रत्युत्तर देणार. तात्पर्य असे की शांततेचा मार्ग तेंव्हाच प्रस्तावित होऊ शकतो जेंव्हा देश सुरक्षित आणि बलवान असतो. शांती सर्वानाच हवी असते आणि प्रत्येक देश त्यामुळेच समृद्ध होत असतो. आज आपण भारताची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि संस्कृतीत वाढबघत असलो तर त्याचे कारण बऱ्याच प्रमाणात देश सुरक्षित आहे. पण तेच आपल्या आजूबाजूच्या कित्येक देशांमध्ये अस्थिरता आहे. आणि त्याचे कारण म्हणजे त्यांच्याकडे बाह्य आणि अंतर्गत सुरक्षेचा अभाव आहे.

त्यामुळे माझ्या मते या आठव्या मराठी विश्व साहित्य संमेलनाचा अगदी योग्य असा विषय निवडला गेला आहे. आणि त्यासाठी मी विश्व परिषदेचे अध्यक्ष कॅप्टन निलेश गायकवाड यांचे अभिनंदन करतो. त्यांचे अशी संमेलने भरविण्यासाठी लागणारे कष्ट आणि मराठी भाषेला जागतिक महत्व मिळावं यासाठीलागनाऱ्यांची कळकळ ही आपणा सर्वांना माहीत आहेच. तसेच अखिल भारतीय मराठी महामंडळाचे अध्यक्ष माननीय डॉक्टर श्रीपाद जोशी ज्यांच्या प्रोत्साहसांमुळे आणि मार्गदर्शनामुळे हे संमेलन भारत आहे त्यांचे पण मी अभिनंदन करतो आणि आभार मानतो. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्रीयुत सुरेश खोपडे यांचे पणअभिनंदन करतो जे देश्याच्या अंतर्गत सुरक्षेच्या विषयांत तज्ञ आहेत. मी अबुधाभि आणि दुबई मधल्या सर्व बांधवांचे आभार मानतो कारण आपण या संमेलनाला सर्व प्रकारची मदत केली आहेच पण आपल्या सर्वांमुळे मराठी भाषा आणि महाराष्ट्रीय संस्कृतीचा आदर अश्या परदेशांतून सुद्धा होत आहे.

सुजलाम् सुफलाम् असा आपला भारत देश आहे. नद्या–खोऱ्यांनी हा देश नटलेला आहे. असा नैसर्गिक वारसा आपल्याला अगदी ऐतिहासिक काळापासून मिळालेला आहे. आपल्या देशाचे नाव हिंद महासागराला दिले आहे. चांगले हवामान आणि शेतीला पोषक वातावरण येथे आहे. संस्कृती वाढण्यासाठीचे पूरकवातावरण या देशात सुरवातीपासून आहे. त्यामुळे अशा समृद्ध देशावर दुसऱ्यांचा, परकीयांचा डोळा असणे स्वाभाविक आहे. एकेकाळी याला भारतवर्ष असे म्हटले जात होते. हा सोने की चिडियाँ' असणारा देश अशी याची ओळख आहे. त्यामुळे येथून काही ना काही घेऊन जाण्यासाठी या देशावर वर्षानुवर्षापासून सातत्यानेआक्रमण झाली आहेत. अलेक्झांडर ग्रेट येथे येण्यासाठी निघाला.त्याला पोरसने थांबविण्याचा प्रयत्न केला. शेवटी तो सिंधू नदी पर्यन्त आला आणि परत गेला. पण काही–काही आक्रमक भारतात आले आणि परत गेलेच नाही. ते येथेच राहिले. मोघल परकीय म्हणून येथे आले आणि त्यांनी या देशावर राज्य केले. मराठ्यांनीअटके पर्यंत धडक मारली होती पण त्यांनी दिल्लीमध्ये आपले राज्य स्थापन केले नाही. त्यामुळे आजकालच्या इतिहासात असे म्हणले जाते की ब्रिटिशांनी येऊन आपल्यावर राज्य केले ते त्यांनी मोघलांकडून घेतले. जिथे कित्येक वर्षां पासून भारतीयांचे सार्वभौमत्व असायला पाहिजे होतं, त्या ऐवजी परकीयांची सत्ता यादेशावर राहिली आहे.

दीर्घ काळांपासून आपला देश समृद्ध होता. संस्कृती येथे विकसित झाल्या होत्या. येथे वैज्ञानिक दृष्टी होती. त्या काळी प्रगत अशी शिक्षण व्यवस्था आपल्याकडे होती. पण, अश्या देशाच्या संरक्षणाकडे आपण लक्षच दिले नाही. हे परकीय आक्रमणाचे मुख्य कारण आहे. उलट आपण आपापसांत भांडत राहिलो. एकविस्तृत

असा भारतवर्ष व त्याला लागणारी दूरदृष्टी या विचारास आपण मुकलो. त्यामुळे आक्रमकांच्या पारतंत्र्यात आपल्याला रहायला लागले. याकरिता सुरक्षितता आणि समृद्धी या दोघांची एक सांगड आहे. ते दोघेही एकमांवर निर्भर असतात. आजच्या आधुनिक काळाततर याची जास्त गरज आहे. सुरक्षितता असल्या शिवाय देशाला समृद्ध करता येत नाही. समृद्ध होत असताना आत्मनिर्भरता झाली तर ती सुरक्षिततेसाठी अधिक मोलाची ठरू शकते. त्याच्या मध्ये आपल्या देशात सुरक्षेसाठी लागणाऱ्या गोष्टी तयार करणे हे असतेच पण मुख्य म्हणजे सर्व भारतीय त्यासाठी एकत्र आलेले असतात. परदेशात स्थायिक झालेल्या भारतीय नागरिकांचा पण त्यात मोलाचा हातभार असतो. त्यामुळे आता आपण जेव्हा राष्ट्रीय सुरक्षतते बद्दल बोलतो त्या वेळी ती केवळ सैनिकी दले किंवा त्या–त्या वेळी असलेल्या राजकीय नेतृत्त्वापूरती नसते. प्रत्येक भारतीयाचा यात समावेश असतो. आता राष्ट्रीय सुरक्षतेला फक्त सिमांची सुरक्षा किंवा लष्कर मर्यादीत दृष्टिकोनातून बघितले जात नाही. परन्तु त्यात आपण आता निरनिराळ्या पैलूंची चर्चा करतो. बाह्य सुरक्षा, अंतर्गत सुरक्षा, अपारंपरिक सुरक्षाही महत्त्वाची आहे. त्यात ऊर्जा, पाणी, अन्न, शिक्षण याचाही समावेश असतो. त्यामुळे सुरक्षा हा माझ्या दृष्टिकोनातून टॉप डाऊन' आणि त्याच बरोबर बॉटम अप असा विषयआहे. याचा अर्थ वरच्या पातळीवरून खालपर्यंत आणि खालून वरच्या पातळीपर्यंत यातील गोष्टीचे आदान–प्रदान झाले पाहिजे. भारताला समृद्ध करण्यासाठी तळागाळातील लोकांपर्यंत पोचले पाहिजे, की त्यांनी कशा प्रकारचे योगदान दिले पाहिजे. नियम पाळणे, पोलिसांना गुप्त माहिती देणे किंवा बहिष्कार टाकण्याचे आवाहनकेल्यानंतर त्यात सहभागी होणे अशा विविध पैलूंचे जर एकत्रीकरण झाले तर मला असं वाटतं की आपला देश बलाढ्य होऊ शकतो.

मी नेहमी इतिहास आणि भूगोल याचे महत्त्व सांगत असतो. त्यात भारताच्या सिमा आणि भारताचे प्रभाव क्षेत्र (फ्रॉंटियर्स) या बद्दल बोलणे येथे योग्य होईल. सिमा या प्रत्यक्ष जमिनीवर असतात. नकाशांमधून रेषांच्या माध्यमातून त्या आपल्याला पाहायला मिळतात. भारतात पाकिस्तानबरोबर आंतरराष्ट्रीय सिमा आहे. त्याच बरोबर एलओसी' आणि एलएसी'पण आहे. चीनबरोबर साडेतीन हजार किलो मीटरची सिमा आहे. पण समुद्राच्या बाजूलाही सिमा असतात. त्यामुळे देशांचे सामुद्रीक इकॉनॉमिक झोन असतात. या झाल्या प्रत्यक्ष सिमा. पण, सिमांच्या पलीकडेही असते त्याला फ्रँटियर्स' म्हटले जाते. ही फ्रँटियर्स' म्हणजे काय, तरआपला प्रभाव जिथे पडू शकेल असे क्षेत्र. त्यासाठी प्रत्येक देश प्रयत्न करत असतो. उदा. मराठ्यांचे सामाज्र जेव्हा अटकेपर्यंत गेले त्या वेळी प्रत्यक्ष पाहायला गेले तर त्यांना दिल्ली किंवा जास्तीत जास्त पानिपतपर्यंत त्यांचे सार्वभौमत्व स्थापन करायचे होते. पण, परकीय आक्रमणांचा ज्या बाजूने त्रास होत होता, त्यांना यातूनथेट संदेश द्यायचा होता की तुम्ही जर दिल्लीकडे यायचे प्रयत्न केले तर आम्ही अटकेपर्यंत येऊ शकतो. त्यामुळे हा जो मधला भाग आहे. त्याला आपण बफर' असे म्हणतो. हा झाला एक लष्करी दृष्टिकोन. आज–काल राजकीय फ्रँटियर्स' देखील असतात. तसेच सांस्कृतिक फ्रँटियर्स' देखिल असतात. आखाती आशिया हे त्याचे एक व्यावहारिक उदाहरण आहे. बुद्धीझमचा जसा उत्तरेत प्रसार झाला तसा हिंदूझम ही बाली पर्यंत पोचला. त्यात कोणत्या सैन्य दलांचा किंवा शक्तीचा प्रयोग केलेला नव्हता. त्यामुळे फ्रँटियर्स'मध्ये काही घडामोड घडली तर त्याची माहिती आपल्याला तत्काळ मिळते. कारण, त्यानंतर थेट आपल्या देशाच्या सिमाअसतात.

त्यामुळे आज जो आपला स्वबळावर उभा असलेला देश आहे त्यांच्या फ्रँटियर्स'बद्दल बोलतो तर त्या पूर्वेला मल्लाका, पश्चिपमेला लाल समुद्र, उत्तरेला मध्य अशिया आणि दक्षिणेला हिंद महासागरापर्यंतच्या पलीकडे अंटार्क्टिक सामुद्रिक क्षेत्राचा समावेश होतो. अशा तऱ्हेचा प्रभाव वाढविणे हे फार महत्त्वाचे असते. विशेषतः आता भारतीयांची आंतरराष्ट्रीय कामगिरी वाढत आहे. तसेच, इतर देशांमधील भारतीय नागरिकांचे कतृत्त्व वाढत आहे. आपण ज्या एमिरेट्स मध्ये जमलेले आहोत आणि संपूर्ण middle east मध्ये सुध्दा बघितले तर प्रत्येक क्षेत्रामध्ये भारतीयांचे योगदान बघायला मिळत आहे. त्यातूनच हा प्रभाव वाढत असतो. व्यापार, आर्थिक संबंध यातूनही फ्रँटियर्स'च्या कक्षा रुंदावतात. भारतीय उपग्रहांमधून जेव्हा आपण आपला देश बघतो तो आता खूप विस्तारित आहे. तो आता संकुचित राहिलेला नाही. हा जो बदल झालेला आहे तो गेल्या काही वर्षांमध्ये झालेला आहे.

आपल्या देशाला एक फार मोठा वारसा मिळाला आहे आणि तो म्हणजे आपल्या देशाच्याच नावाचा महासागर, 'हिंद महासागर' किंवा 'Indian Ocean'. पण ह्याच महासागरा बद्दल चीन आपल्याला आता धमकावत आहे. 'String of Pearls' च्या धोरणा नुसार आपल्या आजू–बाजू च्या देशांमधे चिनी साहाय्यानेत्यांचे समुद्री तळ बसवत आहे. चीन आपल्याला रोखून म्हणतो कि हिंद महासागर चा अर्थ हिंदुस्थानचा महासागर असा नाही. आणि त्याचे कारण आपण पिढ्यान पिढ्या हातावर हात देऊन बसलो होतो. आपण आपल्या सागरी सीमांचे रक्षण केले नाही आणि सागरी संपत्ती सुद्धा जपायला मुकलो. भारताचा समुद्री किनारा ७५०० किलोमीटर आहे आणि त्याबरोबर जवळ जवळ २ मिलियन Square km Exclusive Economic Zone आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दूरदृष्टी दाखवून सुद्धा आपण सामुद्रिक सुरक्षा आणि त्यामुळे मिळणारी समृद्धी या कडे वर्षानु वर्षे लक्ष दिले नाही ज्यामुळे पाश्च्यात्य राष्ट्रांनी आपणावर राज्य केले. आज ९५ प्रतिशब्द व्यापार, उर्ज्याला लागणारी साधने इत्यादी समुद्रामार्गी येतात. त्यामुळे आता Deep-sea तसेच Outer Space ह्या नवीन फ्रॉन्टिर्स झाल्या आहेत. अभिमानाची गोष्ट म्हणजे आपण अंटार्क्टिका मध्ये पाय रोखून आहोत आणि इसरो च्या माध्यमातून चांद्रयान आणि त्या पलीकडे मंगळयान सारखे यशस्वी उपक्रमकरत आहोत. माननीय पंतप्रधांनी या वर्षीच्या स्वातंत्र दिनी

दिलेल्या भाषणानुसार २०२२ पर्यंत आपण एक भारतीय अंतराळवीर पण पाठवणार आहोत. आपल्या नौसेनेला Blue Water Navy म्हणतात तर Air-to-Air Refueling मुळे भारतीय वायू सेना कित्येक लांबचे पल्ले गाठू शकत आहे.

आपण स्वातंत्र्योत्तर ७१ अश्या भारताबद्दल बोलत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ ला सरदार वल्लभभाई पटेल यांनी ५५६ संस्थानिकांना एकत्र करुन आपला भारत देश बनविला. धर्माच्या वरून पाकिस्तान बनला आणि फाळणी झाली. भारताला स्वातंत्र्य मिळून अवघे दहा आठवडे झाले होते. अजूनही देशांमध्ये असलेल्या वेगवेगळ्या संस्थानिकां मध्ये करार सुरू होते. हैदराबाद, जुनागढ आणि जम्मू–काश्मिर ही तीन संस्थाने भारतात समाविष्ट झालेली नव्हते. अजून वाटाघाटी सुरू होत्या. भारत–पाकिस्तान फाळणीमुळे लोक मारले जात होते, बेघर होत होते. अशा अस्थिरतेचा फायदा घेऊन रझाकार काश्मिर खोऱ्यात घुसले. ते श्रीनगर पासून जेमतेम वीस किलो मीटर अंतरावर होते. अशा वेळेला म्हणजे २६ ऑक्टोबरला १९४७ ला काश्मिरचे महाराजा हरिसिंग यांनी भारतात समाविष्ट होण्यावर स्वाक्षरी केली. त्याच रात्री भारतीय हवाई दलाच्या विमानांनी दिल्लीवरून श्रीनगरच्या दिशेने उड्डाण केले. १ सीख लष्करी तुकडीला घेऊन ते विमान श्रीनगरमध्ये उतरले. या गतीमान हालचालींमध्ये रझाकांराना आपण फक्त थोपविले नाही, तर त्यांना मागे रेटले. अर्थात, त्यानंतरचा इतिहास वेगळाच झाला. पूर्ण जम्मू–काश्मीर आपल्या ताब्यात घेण्याची क्षमता लष्करात असूनही युद्धविराम झाला आणि आपण जिंकत असताना सुद्धा आपणच युनाइटेड नेशन्स मध्ध्ये गेलो. त्यामुळे काश्मिरचा एकतृतीअंश भाग पाकिस्तानकडे आहे. त्याला आपण पाकव्याप्त काश्मिकर म्हणतो. पहिल्यांदा स्वतंत्र भारतात इतिहास आणि भूगोल बदलला गेला. तोही आपल्या विरुद्ध असा.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विकासाच्या काही योजना करण्याचा प्रयत्न महत्वाचा होता. स्वातंत्र्याच्या २ वर्षांपूर्वी नुकतेच दुसरे महायुद्ध संपले होते. युद्धातील हानी लोकांनी आणि आपल्या नेतृत्वांनी बघितली होती. त्यांमुळे सर्वांगीण सुरक्षेकडे बघितलं गेले नाही. जे काही तयारी करण्यात आली ती नुकत्याच झालेल्याभारत–पाक युद्धामुळे सर्व लक्ष हे पाकिस्तानकडे देण्यात आले. चीनकडे कोणी लक्ष दिले नाही. परराष्ट्र धोरणातही चीनकडे गांभीर्याने बघितले नाही. हिंदी–चिनी भाई–भाई' असे त्यावेळचे वातावरण होते. चीनने १९४९ मध्ये कॉम्म्युनिस्ट राज्य स्थापन करून लगेच दुसऱ्याच वर्षी म्हणजे १९५० मध्ये तिबेटवर आक्रमण केलेहोते. इतिहासात बघितलेतर तिबेटवर महाराजा रणजित सिंगच्या लष्करी तुकड्या तेथे लेहमध्ये गेलेल्या आहेत. तेथे शूर जनरल झोरावर सिंग यांच्या नेतृत्वा खाली डोग्रा रेजिमेंटनी १८४० च्या दरम्यान लडाख आणि बाल्टिस्तान जिंकलेले होते. अशा प्रकारे या भागात आपले अस्तित्व होते. परंतु आपल्या स्वातंत्र्यानंतर दोनवर्ष सत्तेवर आलेल्या चीनी कम्युनिस्टने तिबेटवर केलेला कब्जा आपण मान्य केला. त्यानंतर ३० मार्च १९५९ मध्ये दलाई लामा भारतात आले. इतके करूनही आपण ईशान्य भारताच्या सुरक्षितेकडे दुर्लक्ष केले. या दरम्यान १९४८ मध्ये हैदराबाद संस्थान भारतात समाविष्ट करण्यात आले होते. त्या नंतर १९६१ मध्ये गोवामुक्ती Operation Vijay करण्यात आले. आपण ज्या चीन बद्दल बोलतोय त्या तुलनेत हे खूपच छोटे यश होते. पण आपण अशा तऱ्हेची उदाहरणे लोक सभेत चीनला धमकी देण्याच्या दृष्टीनी वापरली आणि साहजिकच चीन हे ऐकून घ्यायला तयार नव्हता.

त्यामुळे १९६२ मध्ये चीनने आपल्यावर आक्रमण केले. चीनी सैन्य अरुणाचल प्रदेशाच्या डोंगराळ भागातून पुढे येत तेजपूरपर्यंत पोचले होते. त्यावेळी चीनच्या हल्लय़ाचा प्रतिकार करण्यासाठी भारतीय हवाई दलाचा वापरच केला नाही. आपण १९४७ मध्ये हवाई दल वापरायची तत्परता दाखवली होती. पण यावेळीनेतृत्व संभ्रमात पडले होते आणि त्याचे कारण होते चुकीचं गुप्तहेर मत. जोपर्यंत युद्ध हे शत्रूच्या प्रदेशामध्ये घेऊन जात नाही, तोपर्यंत ते युद्ध जिंकताच येत नाही. हे आपल्याला शक्य होते. नुकतेच कोरियन युद्ध संपलेले होते. चीनचे हवाई दल सक्षम नव्हते. सोविएत युनियन (रशिया) बरोबरच्या संबंधात तणाव सुरु झालाहोता. अशा वेळी जगाचे लक्ष Cuban Missile Crisis वर केंद्रित होते. याचा पुरेपूर फायदा चीनने उचलला. त्याच बरोबर आपण या आघाडीवर युद्ध करायला तयारच नव्हतो. सैनिकांना थंडीत लढण्यासाठी आवश्याक पायाभूत सुविधाही मिळाल्या नाहीत. चिनी सैनिक तेजपूर पर्यंत आले होते, त्यावेळी हवाई दलाच वापर केलाअसता तर चिनी सैनिकांना परत मागे फिरणे शक्यध झाले नसते. जरी आपण खिंडी मधल्या चिंचोळ्या रस्त्यांवर बॉम्ब् टाकले असते तरी दरड कोसळली असती व हजारो चिनी सैनिक युद्धकैदी झाले असते. त्यामुळे एका वेगळ्या पद्धतीची चर्चा दोन्ही देशांमध्ये झाली असती. पुन्हा एकदा स्वतंत्र भारताचा इतिहास आणि भूगोल बदलला की जो आपल्याला बाजूने नव्हता. या सर्वांचे परिणाम आजही आपण कोणत्या–ना–कोणत्या कारणांनी भोगत आहोत.

१९६२ च्या युद्धाच्या नंतर, मी म्हणेन की एक फार चांगली गोष्ट झाली. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री म्हणून केंद्र सरकारमध्ये गेले. २० नोव्हेंबरला १९६२च्या रात्री चीनी सैनिक परत जात असताना त्यांनी संरक्षण मंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली. त्यांनी पहिले काम केले तेम्हणजे उच्य स्थरीय नेतृत्वामध्ये समन्वय आणला. राजकीय नेतृत्व, नोकरशाही आणि लष्कर यांना एकत्र आणले. त्यांच्या संयुक्त बैठका सुरू झाल्या. स्पष्ट बोलणं हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यामुळे १९६२चा पराभव होऊन देखिल सैन्याचा आत्मविश्वानस वाढला. त्यांनी युद्धसाहित्य खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू केली. लष्करी व्यवस्था सुधारण्याला गती आली. त्यामुळे पंडित नेहरू यांच्या निधनानंतर १९६४ मध्ये पंतप्रधान झालेल्या लालबहादूर शास्त्री यांच्या काळात एक वेगळाच भारत आकार घेत होता. याच वेळी पाकिस्तानला वाटते की भारतातील अस्थिरतेचा फायदा घ्यावा. पाकिस्तानने १९६५च्या युद्धापूर्वी चरू मध्ये कच्छच्या

भागात लुडबूड केली होती. त्यावेळी Britain चे पंतप्रधान विल्सन यांच्या समझोत्या मुळे सुमारे ९०० चौरस किलोमीटरचा भाग आपल्याला पाकिस्तानला द्यावा लागला. हा तिसऱ्यांदा काही प्रमाणात का होईना स्वतंत्र भारताचा भूगोल आपल्या विरुद्ध परत बदलला. पण, पाकिस्तानने १९६५ साली आपल्यावर हल्ला केला त्या वेळी त्यांनी'ऑपरेशन जिब्राल्टरच्या' सहाय्याने वीस हजार सैनिक काश्मिरमध्ये घुसविले. त्यांना वाटले होते की १४ ऑगस्टला म्हणजे पाकिस्तानच्या स्वातंत्र्य दिनी ते श्रीनगरमध्ये ध्वजारोहण करतील. आयुब खान यांच्या मुलांनी Gohar Ayub Khan यांनी लिहिलेल्या पुस्तकात याचा संदर्भ आहे. त्या वेळचे पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री भुट्टो यांनी कसं आपल्या वडिलांना फसविले हे त्यांनी लिहिले आहे. १४ ऑगस्टला श्रीनगरमध्ये पाकिस्तानचा झेंडा फडकवू आणि ८ सप्टेंबरला तुम्ही दिल्लीच्या लाल किल्लयात रात्रीचे जेवण घ्याल, असे भुट्टो यांनी Field Marshal Ayub khan यांना सांगितले होते. पण, झालं सगळं उलटं. काश्मिरचे शूर म्हणजे काश्मिरी पुरुष आणि महिलांनी भारतीय लष्कर व तेथील पोलिस यांना मदत केली. आपण, इतके आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करणारे आहोत, की तेथे म्हणजे काश्मिर खोऱ्यात भारतीय हवाई दलाचा तळ देखील आपण वापरत नव्हतो. पण, पाकिस्तानमधून आलेल्या घुसखोऱ्यांच्या बीत्तम बातम्या तेथील नागरिकांनी लष्कर आणि पोलिसांना दिल्या. त्यामुळे काश्मिरमध्ये घुसलेल्या घुसखोरांना पिटाळण्यात मोठे यश लष्कराला मिळाले. अर्थात, घुसखोरांच्या हालचालींची माहिती दिल्यामुळे असंख्य काश्मिंरी नागरिकांना पाकिस्तानने मारुन टाकले. पण तरीही पाकिस्तानचा हल्ला यशस्वी झाला नाही. असंख्य घुसखोरांना भारतीय लष्कराने त्यावेळी पकडले होते. त्यानंतर पाकिस्तानने छाम्ब Chhamb सेक्टरमध्ये आक्रमण केले. त्यावेळी संरक्षण मंत्री असलेल्या यशवंतराव चव्हाण यांनी तातडीने हवाई दल वापरण्यास परवानगी दिली. हे हवाई दल वापरण्यास परवानगी देण्याबाबत त्या वेळी चव्हाण यांचे पंतप्रधान यांच्याशी बोलणेही होऊ शकले नव्हते. तरीही त्यांनी प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन हवाई दल वापरण्याची परवानगी Marshl Arjun Singh याना तातडीने दिली (मागच्या वर्षी या शूर हवाई योद्ध्याचे निधन झाले). त्यानंतर भारतीय सैन्य लाहोरपासून फक्त वीस किलो मीटर अंतरावर असताना युद्धविराम झाला.

युद्धात तत्परतेने सगळ्या गोष्टी वापरणे हे आवश्यवक असते. जसं आपण १९४७ साली केले तसे १९६५च्या युद्धात केले. त्यामुळे ती लढाई आपण जिंकलो. द्वारका बेटाजवळ असलेल्या तीन भारतीय बोटींवर पाकिस्तानी नौसेनेने आक्रमण केले. त्यात त्या बोटींना हानी पोचली. ही आश्चर्याची गोष्ट आहे कि १९६५ च्या युद्धात हरलेला पाकिस्तान अशा फार काही महत्व नसलेल्या घटनेला विजय दिन म्हणून साजरा करतो.या युद्धात मुख्य म्हणजे आपण हाजिपीर पास ताब्यात घेतला होता. पण, १९६६ मध्ये ताश्कंद करार झाला त्यात हा व सगळा जिंकलेला प्रदेश पुन्हा पाकिस्तानला देण्यात आला. त्यामुळे या कराराच्या बाबतीत सुद्धा मलावाटतं की एक फार महत्त्वाचे असते ते म्हणजे समन्वय. असे जिंकलेले युद्ध कसे संपवायचे हे सुद्धा महत्वाचे असते आणि त्या साठी सशस्त्र सेनांच्या सूचना लक्ष्यात घेतल्या पाहिजेत.

भारत–पाकिस्तानचे १९७१ साली परत युद्ध झाले. त्या वेळी माझे एनडीए'चे प्रशिक्षण झाले होते. त्यानंतर मी भारतीय हवाई दलात लढाऊ विमानांचा पायलट म्हणून आणि माझा मोठा भाऊ वैभव हा लष्करात artillery मध्ये दाखल झालो. १९७१ च्या युद्धात योगायोगाने आम्ही दोघेही पूर्व पाकिस्तानच्या बाजूला होतो. तो मुक्ती वाहिनी बरोबर होता आणि मी बागडोरा या हवाई तळावर हंटर या लढाऊ विमानांवर होतो. मी १९६८ हवाई दलात दाखल झालो असलो तरीही अत्यंत कमी वेळात लढाऊ विमान चालविण्यात पारंगत झालो होतो. त्यामुळे सर्वांत कनिष्ठ असूनही या युद्धात मला सहभागी होता आले, हे माझे सुदैव आहे.

युद्ध हे फक्त युद्ध लढण्यासाठी नसते ते जिंकण्यासाठी असते. युद्धात कधीही उपविजेता नसतो. भारताने १९६५ सालच्या युद्धात पाकिस्तानचा पराभव केला होता. भारतीय सैन्याने लाहोरपर्यंत मजल मारली होती. या नंतर आता या १९७१ च्या युद्धाला तोंड फुटत होते. आम्ही युद्धासाठी तयार होतो. कशी लढाई जिंकायची तयारी करत होतो. त्याच अनुषंगाने मी सतत म्हणत असतो की आम्हाला संरक्षण सेना म्हणू नये. आम्हाला सशस्त्र सेना म्हणा. कारण, संरक्षण म्हटले की मानसिक दृष्ट्या आपण आपोआप मागे सरकतो. भारताने कधीही आक्रमण केले नाही. सांस्कृतिक दृष्ट्या नैर्ऋत्य अशिया जिंकलेले होते. व्यापाराच्या माध्यमातूनआपण जगाशी जोडले गेलो होतो. पण, आक्रमकता कधीही आपण दाखविली नाही. याचा अर्थ असाही नाही की दुसऱ्या राष्ट्रांनी सातत्याने भारतावर आक्रमण करायचे आणि आपण त्यांना थोपवत रहायचे. भारत आता आत्मनिर्भर आहे. देशात आता आत्मविश्वास आहे. २९ सप्टेंबर २०१६ रोजी मागच्या वर्षी झालेला Surgical Strike हे अश्या आत्मनिर्भर आणि आत्मविश्वास असण्याऱ्या नवीन भारताचे प्रतीक आहे.

पााकिस्तानने ३ डिसेंबर १९७१ ला भारतावर हवाई हल्ले केले. पंजाब मधल्या पठाणकोट पासून ते आग्र्यापर्यंत हवाई हल्ले केले होते. या हल्लयांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी आम्ही तयार होतो. ४ डिसेंबरला युद्धासाठी आम्ही सज्ज झालो होते. आम्हाला या युद्धात मुक्ती वाहिनी यांची खूप मदत झाली. त्यांच्या बंगाली नागरिकांवर अतोनात अत्याचार झाले होते. मी बागडोरा विमानतळावरून Hunter लढाऊ विमानातून हल्ले करण्यासाठी सज्ज होतो तर माझा मोठा भाऊ कित्येक महिन्यांपासून मुक्ती वाहिणीनं बरोबर त्यांना प्रशिक्षण देत होता

हवाई दलाची आणि लष्कराची लढाई वेगळी असते. आम्ही

आकाशातून बॉम्ब, रॉकेट टाकतो. त्यामुळे युद्धभूमीवरील प्रत्यक्ष रक्तपात आम्ही बघत नाही. पण, लष्कर या सर्वाच्या अगदी जवळ असते. आमच्या Squdron चा एक पायलट मृत्युमुखी पडला तेव्हाच खरी लढाई ही कल्पना नसून असे प्रत्यक्षात होते असे मला समजले. पहिल्या दिवसांमध्ये पूर्व पाकिस्तानचे हवाई तळ उद्धस्त झाले होते. त्यामुळे लवकरात लवकर ढाका पडले पाहिजे, हे साध्य झाले होते. ढाकाचे संरक्षण करण्यासाठी सीमेवरून सर्व पाकिस्तानी सैन्य ढाकाच्या दिशेने परत जात होते. नदीतून बोटीने, रेल्वेने ढाकाकडे निघाले होते. ते ढाकात पोचू नये यासाठी आम्ही त्यांच्यावर हवाई हल्ले करत होतो. आकाशातून पाकिस्तानी सैन्यांनी भरलेल्या रेल्वेचा, बोटींचा अचूक वेध आम्ही घेत होतो.

अवघ्या १४ दिवसांमध्ये ढाका पडले व Lt Gen Niazi यांनी शरणागती पत्करली. या यशामध्ये लष्कर, नौदल आणि हवाई दलाचा मोठा वाटा आहे. हवाई दलाने तेथील गव्हर्नरच्या राजवाड्यावरच हल्ला चढविला होता. त्यामुळे पाकिस्तानी नेतृत्वाने तातडीने युद्धात माघार घेतली. त्यातून ९३ हजार युद्धकैदी झाले. १९४७ नंतर पहिल्यांदाच स्वतंत्र भारताचा इतिहास आणि भूगोल आपल्याला अनुकूल असा बदलला. एक नवीन देश, बांग्लादेश, जन्माला. आला. त्यामुळे पाकिस्तानच्या निर्मितीपासून सुरू असलेली टु नेशन थेरी' विफल ठरली. त्यांनीच आपल्या मुस्लीमांवर अत्याचार केले. त्यामुळे हा एका दृष्टीने आपला नैतिक विजय आहे, यात शंकाच नाही. एक नवीन देश आपल्यामुळे तयार झाला. ही इतिसाहातील पहिलीच गोष्ट आहे. नवीन देश तयार केला पण आपण त्या देशांत थांबलो नाही. बांगलादेशाच्या लोकांना त्यांचा कारभार सोपवून आपले सर्व सैन्य भारतात परत आले. युद्ध करायचे आणि ते कसे थांबवायचे याचे उत्तम उदाहरण म्हणजे१९७१ चे युद्ध आहे.

हे युद्ध फक्त लष्कर लढले नाही, तर प्रत्येक भारतीय तो लढत होता. हे प्रत्यक्षात मी अनुभवले आहे. सगळीकडे मिळाणारे सहाय्य, स्फूर्ती अवर्णनीय अशी होती. माध्यमाकंडून मिळाणारा प्रतिसाद सकारात्मक होता. आम्ही सैनिक म्हणजे वेगळे नसतो. भारतीयांपैकीच एक असतो. त्यामुळे देशातील नागरिकांने केलेले सहाय्य हे सगळ्यात महत्त्वाचे ठरले. त्यानंतर अर्थातच बराच काळ अशा प्रकारचे युद्ध झाले नाही. पण, काही ना काही चकमकी सुरू आहेत.

सिमला करार झाला त्या वेळी नक्की काय झाले हे आजपर्यंत कोणाला समजलेच नाही. त्याचवेळी सियाचिनमधील सिमा निश्चित का झाल्या नाहीत? सिमला करारातून भारताला कित्येक गोष्टी मिळू शकल्या असत्या, असे मला वाटते. आज जे अक्सााई चीन आणि बाल्टिस्तान चर्चित आहे ते कदाचित तेव्हाच संपले असते. पुन्हा एकदा समन्वयाची तीव्र आठवण येते.

१९८४ मध्ये सियाचिनवर आपण ताबा मिळविला. तो एक चांगला निर्णय आपण घेतला. आपल्याला जेव्हा कळाले की पाकिस्तान चीनशी हातमिळवणी करत आहे. त्यावेळी तातडीने पावले उचलली गेली होती. आतापर्यंत तेथे असंख्य जवानांनी हौतात्म्य दिले आहे. हा दुर्गम असा प्रदेश आहे. माणसांना राहण्यासाठीअत्यंत प्रतिकूल वातावरण तेथे आहे. त्यामुळे लष्करातील अनेक जवान तेथे जखमी झाले आहेत. भारतीय हवाई दलाच्या विमानांचे पण अपघात झाले आहेत. गेल्या कित्येक वर्षांत अत्यंत दुर्गम भागातून हेलिकॉप्टर कशी चालवायची याचे प्रशिक्षण आम्ही घेतले आहे. या सर्वांमुळे सियाचीनमध्ये आज भारतीय लष्कर पाय रोवून उभे आहे.

सियाचिनला एक न्यूट्रल प्रदेश करू, अशी एक चर्चा मध्यतंरीच्या काळात सुरू झाली होती. हा प्रदेश कोणाच्याच वर्चस्वाखाली नको, असाही एक मतप्रवाह सुरू होता. मी याच्याशी अजिबात सहमत नाही. एकतर, आपल्या पाकिस्तान सारख्या शेजाऱ्यावर कधीच विश्वास ठेवू नये. सियाचीन एवढा मोठा प्रदेश आहे. तेथे प्रचंड प्रमाणात ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा येथे मोठ्या प्रमाणात निर्माण करता येईल. तसेच, हीच रेंज पुढे अफगाणीस्तानात हिंदू कुश आणि काराकोरममध्ये जाते. त्या रेंजमध्ये आजकाल इतके खनिजद्रव्य मिळत आहे. अफगाणीस्तानमध्ये खूप सिलिकॉन मिळत आहे. त्यामुळे या सियाचीनच्या भागात ते मिळणारच नाही, असे कसे म्हणता येईल. असे काहीतरी करार करून आपण आपल्या पुढच्या पिढीवर अन्याय का करायचा? आधीच आपण केलेले कित्येक करार आपल्यासाठी विफल ठरले आहेत. त्यामुळे असे अजिबात करू नये, असे मला ठामपणे वाटते.

आता आपल्याला सुरक्षततेची जाणीव झाली आहे. नुकताच झालेला Doklam स्टॅन्ड-ऑफ हे आपल्या राजनीती, विदेशनीती आणि लष्करी समन्वयाचे उत्तम उदाहरण आहे. चिनी गोष्टींवर बहिष्कार घालण्यास तितक्याच तत्परतेने प्रतिसाद देणारे भारतीय हे सुध्दा ह्या भूमिकेचे एक महत्वाचे अनुयायी आहेत. मी म्हणेन कि भ्रष्टाचाराच्या विरुद्ध नोटबंदी हे एक धाडसी पाऊल होते. पण त्याच बरोबर कित्येक महत्वाची पावले उचलली जात आहेत. GST, Digital Payment, Use of -adhar and Pan Cards, Restructuring Taxation इत्यादींमुळे अकाउंटिंग मध्ये पारदर्शकता आणली जाईल. अर्थातच हे सर्व करतांना Cyber Security वर बारकाईने लक्ष ठेवावे लागेल. अशा पारदर्शकतेचा उत्तम उदाहरण म्हणजे काश्मीर मधल्या आतंकवादाला आणि दगडफेकीला पुरवला जाणारा काळा आणि बेनामी पैसा ज्याचा मार्ग आता आपल्याला समजतो आहे. या संदर्भात म्हणूनच माननीय श्रीमती सुषमा स्वराज यांनी म्हटले आहे, Terrorists do not own banks or weapons factories. So let us ask the real question : who finances these terrorists? Who arms them and gives them sanctuaries?

या वाढत्या आतंकवादा च्या विरुद्ध आपण वेगळी वेगळी पाऊले उचलत आहोत. पण, त्यातही गुप्तवार्ता हा सर्वांत महत्वाचा भाग आहे.

गुप्तहेरातली विफलता आपल्याला नेहमीच भोवली आहे. १९४७ सालच्या युद्धात आपण शेवटपर्यंत गाफीलच राहिलो. श्रीनगरच्या अगदी जवळ पाकिस्तानचे सैन्य आले होते. तोपर्यंततेथे भारतीयांना पोचण्याचा मार्ग नव्हता, असे आपल्याला या प्रकरणात म्हणता येईल. पण, १९६५ च्या युद्धात २० हजार सैनिक भारतीय काश्मीरच्या खोऱ्यात घुसले ते आपल्याला कळले नाही. त्यानंतर १९९९च्या कारगिल युद्धातही असेच. हिवाळ्यात बर्फाच्छादित प्रदेशातून आपले सैन्य खाली यायचे. तसेच, पाकिस्तानहीत्यांचे सैन्य खाली घेत असे. पण, १९९९ साली पाकिस्तानी सैन्य बर्फाच्छादित भागातून खाली गेलेच नाहीत. पाकिस्तान म्हणाले की, ते लढणारे स्वातंत्र्यवादी आहेत, दहशतवादी आहेत. पण, प्रत्यक्षात ते पाकिस्तानी सैनिक होते. या गाफील राहण्याची मोठी किंमत आपल्याला मोजावी लागली. ६०० हून अधिक जवान आणितरुण अधिकारी यात शहीद झाले. भारतीय हवाई दलाचीही तीन विमाने यात पडली. सर्वांत शेवटी विजय आपलाच झाला. या युद्धात हवाई दलाचा एक हात बांधला गेला होता. राजकीय नेतृत्वाने स्पष्ट सांगितले होते की, हवाई हल्ले करताना नियंत्रण रेषा ओलांडायची नाही. पण, त्यामुळे अनेक युक्त्या करण्यात आल्या. लेझरबाँम्बचा वापर त्यासाठी करण्यात आला. त्यांच्या रसद पुरवठ्यावर हवाई दलाने हल्ला केला. त्यामुळे पाकिस्तानची युद्ध करण्याची क्षमता संपली. पाकिस्तानने ताब्यात घेतलेला भाग पुन्हा आपल्या ताब्यात घेण्यात आला. पण, यात गुप्तहेरांचा खूप महत्त्वाचा भाग येतो.

अजून सुमारे अडीच महिन्यांनी म्हणजे २६ नोव्हेंबर २०१८ हा मुंबई वरील झालेल्या २६/११ च्या भीषण आतंकवादी हल्लूयामध्ये वीरगती पावलेल्या शूरांचा स्मृतिदिन. हा हल्ला सबंध देशाला लाजिरवाणा करणारा प्रसंग. पाकिस्तान मधून समुद्रातून आलेल्या आतंकवाद्यांनी मुंबई मध्ये येऊन कित्येक निरपराधीलोकांचा संहार केला. त्या नंतर कोस्टल सुरक्षे वर खूप चर्चा झाली. गुजराथचा समुद्री किनारातर पाकिस्तानच्या सर्वात जवळ. त्या मुळेच १९६५ च्या युध्दात पाकिस्तानी नौदलाने द्वारका बंदरावर हल्ला केला होता. पण २६/११ नंतर जर आपण समुद्री सुरक्षा वाढवली नाही तर पुन्हा एखादा घातक परिणाम आपल्याला भोगावालागेल. या साठी नौदल, तटरक्षक आणि पोलीस यांच्या मध्ये खूप समन्वय असण्याची जरुरी आहे. आणि त्याच बरोबर गुप्त खात्याची, administrative bureaucracy ची आणि सर्व सामान्य जनतेच्या बरोबर समन्वय असण्याची नितांत आवश्यकता आहे.

भविष्यात काय होऊ शकते, ही सगळ्यात महत्त्वाची बातमी गुप्तहेरांकडून मिळाली पाहिजे. ह्याला मी Predictive Intelligence म्हणतो. Postmortem करण्यापेक्षा -actionable Intelligence हा दहशतवादासाठी फार महत्त्वाचा मुद्दा असतो. आपल्याला काही गोष्टी कित्येक कारणांनी आधी कळू शकल्यातर, नंतर झालेल्या दुर्घटनेची तीव्रता कमी करता येते. यात सगळ्या भारतीयांनी सहकार्य केले पाहिजे.

भारतीय संरक्षण दल हे म्हणण्यापेक्षा सशस्त्र किंवा लष्करी दल असे म्हणा, यावर माझा आग्रह असतो. कारण, संरक्षण या शब्दातच कुठेतरी बचावात्मक पवित्रा दिसतो. ही मानसिकता फक्त गणवेशातील अधिकाऱ्यांच्या पूर्ती नाही, तर सर्व भारतीयांमध्ये आली पाहिजे, आणि ती येते आहे. त्यातून समृद्धी येईल.


संरक्षण सिद्धतेबाबत आपण जितके आत्मनिर्भर होऊ तितकी आपली ताकद वाढेल. त्याच प्रमाणात समृद्धी वाढेल. सौर ऊर्जा आपल्याकडे आहे. पाण्याचा योग्य वापर करून कृषी उत्पादनात आपण आत्मनिर्भर होऊ. मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, यात स्वतःचा सहभाग असला पाहिजे आणि या करिता तरुण पिढीलाउत्तेजित केले पाहिजे.

२०२० साली भारत सर्व देशांत सर्वात तरुण देश होणार आहे. असे योगदान क्वचित मीळते. पण त्याचा आपण फायदा करून घेतला पाहिजे. युवकांसाठी कौशल्य विकास, स्टार्ट-अप्स, Entreprenureship इत्यादी योजनांवर भर देऊन आपण त्यांना आशावादी आत्मनिर्भर नागरिक बनवले पाहिजे. जरी लगेच यश आलेनाही तरी त्यांनी हताश झाले नाही पाहिजे. Late Dr -PJ -bdul Kalam यांनी आपल्या स्वतःच्या अनुभवा नुसार सांगितले आहे, Do not read only success stories, you will get only messages. Read failure stories, you will get some ideas to get success. या साठी परदेशात राहणाऱ्यानागरिकांचाही मोठा भाग आहे. कारण, जगभरात काय सुरू आहे, याची अद्ययावत माहिती तेथील भारतीयांना असते. त्या आधारावर आपल्या देशाची कशी प्रगती करता येईल, ह्याचे मार्गदर्शन ते करू शकतील.स्टार्ट अप्सला मदत करणे येथील नागरिकांना शक्य होईल. नवीन Technolgy चा अजून कसा भारताला फायदा होईल हे चांच्यामार्फत आपल्या भारत देशाला समृद्ध करता येईल, ह्यावर माझा ठाम विश्वास आहे.

चाणक्यनीती, विवेकानंद आणि स्वातंत्रवीर सावरकरानी दिलेले आशीर्वाद यातून आपण समर्थ होऊ, याबद्दल माझ्या मनात शंका नाही. मी एक आशावादी भारतीय आहे आणि माझी खात्री आहे कि आपली विषमता आणि गैरसमज बाजूला ठेवून आपण सर्वजण आपल्या भारतवर्षाला सुरक्षित आणि समृद्ध बनवू. माननीय दलाई लमा नेहमी म्हणतात,Chose to be optimistc, it feels better. आणि एक लढाऊ वैमानिक म्हणून मी नेहमी George Bernard Shaw bm quote करतो, An optimist designed an aircraft and pessimist a parachute.

जय हिंद !

****



# मराठी साहित्य व अंतर्गत सुरक्षितता

– सुरेश खोपडे (IPS)



विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी साहित्याचा जागतिक पातळीवर जागर होतो आहे, ही मराठी साहित्यसृष्टीसाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे. या संमेलनाचे हे आठवे वर्ष आहे. दरवर्षी या संमेलनासाठी विशिष्ट विषय निवडण्याचा एक नवा प्रवाह संयोजकांनी रुढ केला आहे हे या संमेलनाचे एक वैशिष्ट म्हणावे लागेल. त्यातही यंदाच्या संमेलनासाठी निवडलेला 'संरक्षण' हा विषय तर विशेष उल्लेखनीय आणि कौतुकास्पद आहे. याचे कारण मराठी साहित्यात संरक्षण या विषयावर किती लिखाण झाले आहे यापेक्षा ते किती गुणात्मक, दर्जात्मक आहे आणि ते किती वाचकांपर्यंत पोहोचलेले आहे हा संशोधनाचा विषय आहे. या पार्श्वभूमीवर संमेलनासाठी निवडलेला प्रमुख विषय महत्त्वाचा ठरतो. संरक्षण या विषयाला अनेक पैलू आहेत. त्यातील 'अंतर्गत सुरक्षितता' या विषयावर मी या लेखातून टिप्पण करत आहे. मुळात या विषयावर मराठी साहित्यात नेमके किती आणि काय लेखन झाले आहे याची सर्वसामान्यांना अत्यल्प कल्पना आहे. अगदी सुजाण, चौकस म्हणवल्या जाणाऱ्या वाचकांनाही याबाबत नेमकेपणाने माहिती देता येणार नाही अशी स्थिती आहे. अशा परिस्थितीत मी आजवर पोलिस दलात केलेल्या सेवेतील अनुभवादरम्यान आढळलेले, टिपलेले आणि अभ्यासलेले वास्तव मांडत आहे.

अंतर्गत सुरक्षितता निर्माण करणचे कार्य भारती गुन्हे न्यायव्यवस्थेद्वारे केले जाते. सुरक्षिततेला बाधा आणणारी एखादी घटना घडली अगर घडणची खात्रीशीर माहिती असेल तर पोलीस यंत्रणा त्याची पहिली खबर म्हणून नोंद करते. तपास पूर्ण करून पुरेसा पुरावा असेल तर न्यायालयात चार्जशीट दाखल करते. आवश्यकता वाटल्यास जिल्हादंडाधिकारी ही दुसरी यंत्रणा आरोपींचे चांगल वर्तनाचे बाँड घेते. न्यायालयात पाठविलेल्या आरोपीला शिक्षा द्यायची की सोडायचे हे काम न्यायव्यवस्था ही तिसरी यंत्रणा करते. शिक्षा झालेल्या आरोपीला जेलमध्ये ठेवून सुधाराचे काम जेलप्रशासन ही चौथी यंत्रणा करते. या प्रत्येक विभागातील प्रशासकी अधिकारी तज्ज्ञ, विधिज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आपले संशोधन व अनुभव साहित्यात आणू शकतात. गुन्हे घडू नयेत यासाठी राज्य सरकारकडे सबसिडीअरी इंटेलीजेंस डिपार्टमेंट, सी.आ.डी.क्राईम, जिल्हा विशेष शाखा यांसारख्या यंत्रणा आहेत. केंद्र शासनाकडे आय.बी, सीबीआय, रॉ., एन.आय.ए. सारख्या संघटना आहेत. त्याशिवाय स्थानिक पोलीस यंत्रणेच्या मदतीला पॅरा मिलिटरी फोर्सचे अनेक विभाग आहेत. त्यातील अधिकारी साहित्यनिर्मिती करू शकतात. प्रत्येक प्रभावी अधिकाऱ्याचे जीवन मनोरंजक, माहितीपूर्ण व उद्बोधक ठरणारे आहे. पण असे लेखन फारसे होताना दिसत नाही. याला अनेक कारणे आहेत.

कारण अलीकडेच संशोधनानुसार नेतृत्व गुणांसाठी अनेक बुद्ध्यांक आवश्यक असल्याचे आढळून आले आहे आणि त्यापैकी काही बुद्ध्यांक मोजता येतात. उदाहरणार्थ, हाताखालचे कर्मचारी व जनता यांच्या भावनेला हात घालून काम करण्यासाठी इमोशनल आक्यू,व्यक्ती–व्यक्तीमध्ये संवाद वाढविणसाठी इंटरपर्सनल आक्यू, मोठ्या समुहाच्या संपर्कासाठी इंट्रापर्सनल आक्यू, नाविन्यपूर्ण योजना व प्रयोग आखण्यासाठी क्रियेटीव्ह आयक्यू अशा अनेक बुद्ध्यांकांची गरज असते. हे व यासारख्या बुद्ध्यांकांचा उमेदवार निवड करताना विचारात न घेतल्याने जनतेला पाचपैकी एक योग्य अधिकारी मिळतो. सर्व पदासाठी युपीएससीची एकच परीक्षा घेतली जाते. प्रत्येकाला आएएस अधिकारी व्हायचे असते. प्रत्येक राजमध्ये जिल्हा पोलीस प्रमुख म्हणून असलेल्या अधिकाऱ्यांपैकी किती जणांनी आ.पी.एस.बनण्यासाठी प्रथम प्राधान्य दिले होते ? फक्त दोन टक्के ! ९८ टक्के उमेदवारांना आय.पी.एस. बनायचे नव्हते. आपण आय.ए.एस.मध्ये जाऊ शकलो नाही हे शल्य घेऊन काम करतात. सगळे रडतराव घोडावर बसविलेले असतात. खरे तर पोलीस दल ही एक मर्दानी नोकरी आहे त्याच्यासाठी वेगळा ॲटीट्यूड व ॲप्टीट्यूड लागतो. ते नसलेले तरुण पोलीस दलाचे प्रभावी नेतृत्व करू शकत नाहीत.

जिल्हा पोलीस प्रमुख हे आय.पी.एस.असतात पण त्यांना आय.ए.एस दर्जाच्या जिल्हा दंडाधिकारी /जिल्हा कलेक्टर यांच्या

नेतृत्वाखाली काम करावे लागते. जिल्हा पोलीस अधिक्षक हे एक तांत्रिक कौशल्य असलेले पद आहे. परंतु त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हाधिकारी तसेच राजमध्ये पोलीस महासंचालकांना ॲडीशनल चीफ सेक्रेटरी जे आय.ए.एस. असतात ते मार्गदर्शन करतात. अशा आय.ए.एस.अधिकाऱ्यांनी नोकरीच्या काळात कधीही गुन्ह्याची फिर्याद नोंदवून तपास केलेला नसतो. कमरेला पिस्तुल लावून एका बाजूला हजार दुसऱ्या बाजूला दोन हजार जमाव जमवून जाळपोळ करीत पोलिसावर दगडफेक करतो अशा अवस्थेत कधीही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळलेला नसतो तेच अधिकारी जिल्हा व राज्य पातळीवर पोलिसावर नियंत्रण व देखरेख करतात व राज्य आणि केंद्रीय गृहखात्यामध्ये निर्णय घेतात. या सर्वांवर नियंत्रण व देखरेख करण्याची जबाबदारी गृहमंत्र्याकडे असते ज्यांना शिक्षणाची अट, नसते, प्रशिक्षण व पूर्वानुभव नसतो. अशी भोंगळ व्यवस्था जगात कुठेच पहायला मिळणार नाही. त्यामुळे अंतर्गत सुरक्षिततेचा दर्जा ढासाळलेला आहे.

अंतर्गत सुरक्षितता राखणारे पोलीस दल हा एक सर्व शक्तिमान असा अरबी घोडा आहे. त्यावर बसून समाज आणि देशामध्ये अंतर्गत सुरक्षितता राखणसाठी कुशल जॉकीची गरज आहे. आता मात्र सर्वत्र टांगेवाले दिसतात. अंतर्गत सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी देशाची गुप्तहेर संघटना मजबूत असली पाहिजे. प्रत्यक्षात ती कशी आहे हे समजून घेणसाठी पुढील उदा. महत्वाचे आहे. २६ /११ ला मुंबई हल्ल्यातील जिवंत पकडला गेलेल्या अजमल कसाब नावाच्या अतिरेक्याशी मी तीन तास सलग गप्पा मारल्या. अनेक प्रश्नापैकी एक प्रश्न मी त्याला विचारला होता अजमल तुम्ही फक्त ११ पोरे १२० कोटी भारतीय जनतेवर चालून आला त्यावेळी तुम्हांला इथल्या लोकांची, गुप्तहेर यंत्रणा व संरक्षण यंत्रणेची भीती वाटली नाही का? त्यावर त्याने तत्काळ उत्तर दिले ''ना –हमें डर नही लगा कुयकी हमें हमारे हँडलरने बताया था की इंडिया की आय.बी., सी.बी.आय., रॉ., मुंबई पोलीस बहुत कमजोर है। आणि ते खरे ठरले. त्यादिवशी साडे आठ वाजता आंम्हाला कळविले की दक्षिण मुंबईमध्ये गुन्हेगारांच्या दोन टोळ्यामध्ये चकमक चालू आहे. तुम्ही आपापल्या हद्दीत जा. मी मुंबई नॉर्थ रीजनला ॲडीशनल पोलीस कमिशनर असल्याने बोरविलीकडे निघालो पण रस्त्यात समजले की ते टोळीयुद्ध नसून पाकिस्तानी अतिरेक्यांचा हल्ला होता अशा कमकुवत गुप्तहेर यंत्रणेबद्दल कोण व कशी साहित्य निर्मिती करणार?

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मराठीमध्ये अंतर्गत सुरक्षिततेच्या संदर्भात निर्माण झालेले बहुतेक साहित्य हे मनोरंजनात्मक स्वरूपाचे आढळते. बाबुराव अर्नाळकरांच्या कादंबऱ्या बा.सी.अष्टेकर व इतरांच्या कथा, मराठी वाचकावर प्रभाव पाडणारे,पोलीस दलातर्फे प्रकाशित केले जाणारे 'दक्षता' मासिक, त्यानंतर पोलीस टाईम्स यांसारखी साप्ताहिके गुन्हेगारी विश्वाबद्दल वास्तव माहिती देत मनोरंजन करणारी व त्याचबरोबर सुरक्षा कशी राखावी याबद्दल माहिती देणारी आहेत. अनेक निवृत्त अधिकाऱ्यांनी आपली आत्मचरित्रे प्रसिद्ध केलेली आहेत; पण त्यात आत्मगौरवपर भाग जास्त आहे. त्यांनी हाताळलेल्या कायदा सुव्यवस्था व गंभीर गुन्हाच्या तपासाच्या घटना मनोरंजक पद्धतीने मांडलेल्या आहेत. परंतु गुन्हेगारी शास्त्र भोवतालचे राजकारण, अर्थकारण, समाजकारण, धर्मकारण यांचा विषयावरील साहित्यावर किती व कसा प्रभाव पडतो याचे विश्लेषण फारच कमी प्रमाणात आढळते. आतापर्यंत निर्माण झालेले मराठी साहित्य हे अंतर्गत सुरक्षिततेची कितपत दखल घेते याचा शोध घेणे आवश्यक आहे.

सुरक्षितते संबंधात साहित्य निर्माण न होण्याला दुसरे कारण म्हणजे कालबाह्य शिक्षण पद्धती. प्रचलित शिक्षण पध्दती ही लिनियर थिंकिंग शिकविते. म्हणजेच एका प्रश्नाला एकच उत्तर असते. उदा.प्रश्न विचारला जातो. ताडोबा जंगलात वाघांची संख्या जास्त का आहे ? एका वाक्यात उत्तर द्या. कारण तिथे जास्त घनदाट जंगल आहे. उत्तर देणाऱ्याला पैकीच्या पैकी मार्क मिळतात. यालाच लिनियर थिंकिंग म्हणतात. खरेतर निव्वळ घनदाट जंगला शिवाय वाघाला खाद्य लागते. खाद्याला खाद्य लागते. पुरेसा पाऊस, शिकारी पासून संरक्षण, योग्य व्यवस्थापन यालाच सिस्टिम्स थिंकिंग म्हणतात. लिनिअर थिंकिंग त्यामुळे शिक्षण पद्धतीतून बाहेर पडलेलो आपण सुरक्षिततेसह कोणत्याच प्रश्नाकडे एक व्यवस्था म्हणून पाहू शकत नाही. त्यामुळे त्याची चिकित्सा करून त्यावर लिखाणही होत नाही. या लिनियर थिंकीगचा पगडा सर्व भारतीयांवर पडलेला आहे.त्यामुळे सुरक्षिततेशी संबंधित असलेल्या सर्वच शासकीय संस्थामध्ये ना संशोधन होते,ना संशोधन करणाऱ्याला प्रोत्साहन मिळते. माझे एक उदाहरण बोलके आहे. २२ वर्षे फरारी असलेल्या दरोडेखोरांना पकडताना त्यांनी केलेल्या गोळीबारात मला तीन गोळ्या लागल्या होत्या.आम्ही केलेल्या प्रतीगोळी बारात ते दोघे दरोडेखोर ठार झाले होते. त्यावर आधारित 'रामश्याम शोध दरोडेखोरांचा' हे पुस्तक लिहून त्याची एक प्रत त्यावेळेचे माझे बॉस आयुक्त राज्य गुप्तहेर संघटना यांना दिली. त्यांनी ते पुस्तक एकदा पुढून आणि एकदा मागून बघून लगेच माझ्या हातात देत म्हणाले होते ज्यांना सरकारी काम करायचे नसते ते पुस्तके लिहितात.

भारती शिक्षण पद्धती ही कालबाह्य व अपुरी असून निव्वळ घोकमपट्टीला महत्व दिले जाते व मार्कांच टक्केवारीवर शिक्षणाची व बौध्दिक क्षमता जोखली जाते. स्वत:विचार करणे, प्रश्न विचारणे, चिकित्सा करणे, शोध घेणे याबाबींना महत्व दिले जात नाही.त्यामुळे बाहेर पडलेले तरुण हे सुरक्षितता देणाऱ्या संस्थामध्ये गेल्यावर कुपमंडूक प्रवृतीने काम करतात. बेडकाला जसे विहीर हेच जग व सर्वस्व वाटते त्याप्रमाणे आपण जे शिकलो व पाहिले ते परिपूर्ण आहे. नवीन शिकणची गरज नाही असे समजून निवृत्त होईपर्यंत प्रशिक्षण शाळा ,महाविद्यालामध्ये अगर ॲकडमीमध्ये शिकलेल्या ज्ञानावर नोकरी करीत नोकरशहा निवृत्त होतात. शाळेत शिकवला जाणारा अभ्यासक्रम व वास्तव यांचा कितपत संबंध असतो ?

आमच्या लहानपणी ऐकलेल्या गोष्टी किंवा वाचलेल्या कथामध्ये राक्षसगुण असलेले बकासुर,जरासंध,रावण या व्यक्तींनी साहित्य निर्मिती केल्याचे कधीच ऐकले नाहीत. त्यामुळे अंतर्गत सुरक्षितता राखणाऱ्या दलातील अधिकारी व कर्मचारी यांनी साहित्यनिर्मिती करण्याचे पूर्णपणे टाळलेले आहे. म्हणून कदाचित

मराठीमध्ये ही या विषयावर साहित्य निर्मिती झाल्याचे दिसत नाही. मला विश्व साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून सन्मान पूर्वक निमंत्रित केलेले आहे. पण लिहिणारी व वाचणारीही माझी पहिलीच पिढी. संरक्षण करण्याचे, सुरक्षितता राखण्याचे व लढाई करण्याचे काम असंख्य लोक हजारो पिढ्या करत आलेले आहेत. पण त्यांना राक्षसगुणी ठरवून ज्ञानाचा हक्क नाकारण्यात आला होता. मधल्या काळात राज्यघटनेनुसार समता, बंधुभाव या गोष्टींना महत्व निर्माण झाले आहे.

आजचे एकंदर हे वास्तव पाहता 'आधी केले मग सांगितल' या उक्तीनुसार यावर पर्यायी मॉडेल शोधून आम्ही कामाला सुरवात केलेली आहे. अंतर्गत सुरक्षितता राखण्यासाठी जगातील एक उत्कृष्ट राज्यशासक /प्रशासक छत्रपती शिवरायांच्या शिवशाही मॉडेलचा आम्ही पुन्हा नव्याने शोध घेत आहोत. त्यासाठी हजारो वर्षे दडपलेली परंतु भारतीय राज्यघटनेने बळ दिलेली व नुकतेच वाचायला व लिहाल्या शिकलेली अठरा पगड मावळ्यांची पोरं एकत्र जमायला सुरवात केली आहे. शिवराय आज असते तर त्यांनी आम्हां सर्व आठरा पगड मावळ्यांच पोरांना एकत्र बोलावले असते असे गृहीत धरून कामाला सुरवात केलेली आहे. शिवकालीन गावकी पद्धती, भारती कुटुंब एकत्र पद्धती, जपानची क्वालिटी सर्कल, कायझेन या व अशा जगभर वापरलेल्या व्यवस्थापन पद्धतींचा अभ्यास करीत आहोत. ब्रेन स्टॉर्मीग पद्धतीने चर्चा करून त्यातून हा समाज आणि देश सुरक्षित, समृद्ध आणि निरोगी बनविण्यासाठी अठरा पगड मावळे, शिवशाही मॉडेल बनवित आहोत. ते लवकरच आपणाला पहायला मिळणार आहे.

****

# स्वा. सावरकरांचा भारताच्या संरक्षणा विषयक दृष्टीकोन – एक दृष्टीक्षेप

**– सौ. सुमन मुठे**

स्वा. सावरकरांनी स्वातंत्र्यानंतर भारताच्या संरक्षणा बाबत त्यांची स्वतःची भुमिका अत्यंत स्पष्ट आणि निर्भिडपणे मांडलेली दिसून येते. त्याबाबत आपण त्यांची मते लक्षात घेणे आवश्यक ठरते.

त्यांच्या मते स्वातंत्र्य मिळाले आहे ते टिकवणे हि जबाबदारी तरूण पिढीची आहे. समाजातून असे तरूण तरुणी उत्पन्न होतील कि जे राष्ट्रसाठी अधिक पराक्रम करतील त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयातील तुरूणांनी एन.सी.सी. मध्ये जाणे आवश्यक ठरते.

जेणकरून महाराष्ट्र हा भारताचा खड्ग झाला पाहिजे, आपले सैन्य हे नेहमी आक्रमकच असायला पाहिजे कारण आक्रमक वृत्तीचे सैन्यच राष्ट्राचे संरक्षण करू शकेल. स्वा. सावरकरांच्या मते जो चढाई करतो आक्रमण करतो तो अर्धी लढाई जिंकतो असे स्पष्ट सावरकर व्यक्त करतात.

शिव छत्रपतींच्या काळापासून आक्रमक वृत्ती शत्रुवर चालकरून जाण्याचे धारिष्य महाराष्ट्रामध्ये होते याच धारिष्ट्यामुळे महाराष्ट्रीयन सैनिकांची नर्मदा ओलांडून चंबळच्या खोऱ्यातही प्रवेश केला. थेट दिल्ली आणि त्याहीपुढे हिमालयापर्यंत धडक मारली. अशी धाडसीवृत्ती फक्त महाराष्ट्रापाशीच होती, तसे धारिष्ट इतर कोणत्याही प्रांतापाशी नव्हते असे अभिमान पुर्वक आपले मत मांडतात.

आपला भारतभुमीला प्राचीन काळामध्ये सुवर्णभुमी म्हणून गौरविले जात होते. म्हणूनच जगभरातला आक्रमक आपल्यावर सात्यत्याने आक्रमणे केली कारण त्यांच्या मते आपल्याकडे पुरेसे शस्त्रास्त्रबळ नाही असे ज्ञात झाल्यामुळेच आपली भारतभुमी त्यांनी निष्कांचन केली.

म्हणूनच भविष्यकालीन भारताच्या भक्कम संरक्षणासाठी अत्याधुनिक विमानदल, भूदल, नौदल उभारा आणि छातीचा कोट करून धाडसाने लढू शकेल असे सैन्यदल ही उभारण्याची गरज त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केली. त्याही पुढे जावून ते असेही प्रतिपादन करतात कि त्या विज्ञानाची कास धरणेही आवश्यक आहे. या व्यतिरिक्त उदहरणादाखल जगभरात घडलेला घटनांचा सुद्धा उल्लेख करतात. जर्मनीतील नाझी पक्ष त्यांचा उदय आणि हिटलरचे धोरण जर्मन भाषा बोलणारे जर्मन संस्कृती अभिमान बाळगणारे लोक एकत्र करण्यासाठी हिटलरने केलेल प्रयत्न याचाही उदाहरणा दाखल उल्लेख करतात.

जगाच्या नकाशावरही जर्मनीकरता जर्मन इंग्रजाकरिता इंग्लंड, इटालियनकरता इटली असे भाषावार अभिमानपुर्वक विभाग पडलेले दिसून येतात. तेव्हा केवळ आपल्या राष्ट्राला हिंदुत्ववादी, जातीयवादी म्हणून हिणवणे योग्य नाही असे त्यांनी नमुद करून ठेवले आहे. तेंव्हा आजची भारतातील सामाजिक, राजकीय परिस्थिती पाहाता स्वा. विरांचे भाष्य फारसे चुकीच नव्हते असेच म्हणावे लागेल.

आज स्वातंत्र्यदिनाची प्रौढी मिरवली जाते आनंदाने स्वातंत्र्य दिन साजरा होतो. परंतु मिळालेल्या स्वातंत्र्याबरोबर आज बाह्य आक्रमणांची टांगती तलवार आणि अंतर्गत अराजक यावरही त्यांनी काळाच्या कितीतरी पुढे जाऊन भाष्य केले आहे. हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

आजच्या तरूणाईने संरक्षणाबाबतचे दायित्व आणि कर्तव्य विसरता कामा नये. राष्ट्राचे संरक्षण करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आपले भुदल, नौदल, वायुदल जास्तीत जास्त प्रभावी करणे आणि यामध्ये तरूणांचे कर्तव्य सहभाग महत्वाचा आहे हे स्पष्टपणे नमूद करतात.

तरूणांनी सहभागांच्या संख्येने सेवादलांमध्ये भरती होण्याचा आणि मातृभूमीचे स्वातंत्र्य अबाधित आणि सुरक्षित ठेवण्याचा निर्धार मनापासून करावा.

संदर्भ – समग्र सावरकर (खंड आठवा)
पृष्ठ क्र. ५९/६०/६१/६२/६३

****



# सागरा प्राण तळमळला ....



– शुभा साठे

आपल्या सगळ्यांना माहिती आहे, दिल्लीच्या लाल किल्ल्यावर शंभर–दिडशे वर्षे सामाज्रमदाने धुंद झालेला जो ब्रिटिश युनियन जॅक भारताच्या छातीवर फडकत होता, तो परकीय ध्वज १५ ऑगस्ट १९४७ रोजी उखडून टाकला गेला आणि तिथे स्वातंत्र्याच्या तुमुल जयजयकारात भारतीय महाराज्याचा सुदर्शन चंक्रांकित ध्वज फडकविण्यात आला. महाबलाढ्य इंग्लिशांवर मिळविलेला हा अश्वमेधीय विजय ज्या पानावर अंकित झाला ते हिंदुराष्ट्राच्या इतिहासातील सहावे सोनेरी पान आणि या सोनेरी पानावर आपल्या दैदिप्यमान पराक्रमाच्या स्फुल्लिंगाने चिरंजीव ठरलेलं नाव आहे, स्वा. विनायक दामोदर सावरकर ! एक अलौकिक व्यक्तिमत्व !

स्वा. विनायक दामोदर सावरकर प्रखर देशभक्त होते, द्रष्टे होते, क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान होते, विज्ञाननिष्ठ समाजसुधारक होते. आधुनिकीकरणाचा, सैनिकीकरणाचा त्यांनी सतत पुरस्कार केला. भाषाशुद्धीचा आग्रह धरला. लिपी सुधारणेचा प्रयत्न केला. देशाच्या राजकारणात त्यांनी मार्गदर्शकाची भूमिका बजावली. स्वा. सावरकर अतुलनीय–अजोड वक्ते होते, लेखक होते, इतिहासाचे अभ्यासक, संशोधक आणि इतिहासाचे निर्माते देखील होते. संस्कृत, हिंदी, इंग्रजी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. ते उर्दू गझलकार होते. समाजप्रबोधनासाठी त्यांनी नाटकं लिहिली. कविता, पोवाडे, फटके, लावण्या सुद्धा लिहिल्या. असं हे ''शत' नव्हे 'सहस्त्रपैलू'व्यक्तिमत्व !

पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर बॅरिस्टरकीचा अभ्यास करण्यासाठी १९०६ मध्ये ते लंडनला गेले. तिथे भारत भवन मध्ये राहू लागले. बॅरिस्टरकीच्या अभ्यासाबरोबरच क्रांतीकार्यही सुरू झालं. जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचं मराठीत भाषांतर केलं. त्याला चाळीस पानांची प्रस्तावना लिहिली. ही प्रस्तावना सगळ्या क्रांतिकारकांनी भगवद्गीतेसारखी मुखोद्गत केली. १८५७ चे स्वातंत्र्यसमर लिहिलं. शिखांचा इतिहास लिहिला. फ्री इंडिया सोसायटी अर्थात स्वतंत्र भारत समाजाची स्थापना केली. भारतीय विद्यार्थी संघटीत होऊ लागले. छत्रपती शिवाजी महाराज, गुरू गोविंदसिंग, गुरू नानक अशा महापुरूषांचे स्मृतिदिन, राष्ट्रीय उत्सव, विजयादशमी, रक्षाबंधन असे भारतीय सण साजरे होऊ लागले. अशियन क्रांतिकारकांच्या साहाय्याने बॉम्ब बनवण्याची पुस्तिका मिळवली. तिचं भाषांतर करून पुस्तिकेच्या प्रती भारतात पोहचल्या. ग्रंथामध्ये दडवून पिस्तुले भारतात आली. आणि आता, भारतात क्रांतीचे पडसाद उमटू लागले. एका एका इंग्रज अधिकाऱ्याला यमसदनी पाठवण्यासाठी पिस्तुलांचा वापर होऊ लागला. बॉम्ब फेकले जाऊ लागले. इंग्रजांचे धाबे दणाणले. ह्या सगळ्या घटनांची सूत्रं लंडनमधून हलवली जात आहेत, ह्याचा इंग्रजांना सुगावा लागलाच होता. पुरावा हाती लागताच स्वातंत्र्यवीरांचे मोठे बंधू गणेश दामोदर उर्फ बाबाराव सावरकरांना अटक झाली आणि खटल्याची सुनावणी होऊन जन्मठेप सुनावण्यात आली. ह्या घटनेचा बदला घेण्यासाठी लंडनमधील इम्पीरीयल इन्स्टिट्यूट मध्ये मदनलाल धिंग्राने कर्झन वायलीला आणि नाशिक मध्ये अनंत कान्हेरेनी कलेक्टर जॅक्सनला गोळ्या झाडल्या. अर्थात, ह्या कृत्यासाठी इंग्रज न्यायासनाकडे एकच न्याय होता.... फाशी !

भारतातील अभिनव भारत कार्यकर्त्यांचा आणि सावरकर घराण्यातील स्त्रियांचा, म्हणजे स्वातंत्र्यवीरांची मातृतुल्य वहिनी, येसूवहिनी आणि पत्नी यमुनाबाई यांचा अतोनात छळ होऊ लागला.

लंडनमधील भारत–भवनला कुलूप लागल. सावरकरांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लागला. सततचे कष्ट, ताण आणि अन्न–पाण्यावाचून केलेली वणवण यामुळे सावरकरांची प्रकृती बिघडली. राहायला घर नाही, ब्रॉन्कायटीसची व्यथा स्वस्थता लाभू देत नाही, आणि पारतंत्र्याच्या शृंखलात जखडलेली भारतमाता सतत मनःचक्षूत येऊन डोळ्यात नीज नाही.... मन भारतमातेकडे, भारतात आप्तेष्टांकडे सतत धाव घेत होते. पण आता परतीचे सगळे मार्ग बंद झाले होते . अशा परिस्थितीत,लंडनपासून जवळच असलेल्या

आपल्या सगळ्यांना माहिती आहे, दिल्लीच्या लाल किल्ल्यावर शंभर–दिडशे वर्षे सामाज्रमदाने धुंद झालेला जो ब्रिटिश युनियन जॅक भारताच्या छातीवर फडकत होता, तो परकीय ध्वज १५ ऑगस्ट १९४७ रोजी उखडून टाकला गेला आणि तिथे स्वातंत्र्याच्या तुमुल जयजयकारात भारतीय महाराज्याचा सुदर्शन चंक्रांकित ध्वज फडकविण्यात आला. महाबलाढ्य इंग्लिशांवर मिळविलेला हा अश्वमेधीय विजय ज्या पानावर अंकित झाला ते हिंदुराष्ट्राच्या इतिहासातील सहावे सोनेरी पान आणि या सोनेरी पानावर आपल्या दैदिप्यमान पराक्रमाच्या स्फुल्लिंगाने चिरंजीव ठरलेलं नाव आहे, स्वा. विनायक दामोदर सावरकर ! एक अलौकिक व्यक्तिमत्व !

स्वा. विनायक दामोदर सावरकर प्रखर देशभक्त होते, द्रष्टे होते, क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान होते, विज्ञाननिष्ठ समाजसुधारक होते. आधुनिकीकरणाचा, सैनिकीकरणाचा त्यांनी सतत पुरस्कार केला. भाषाशुद्धीचा आग्रह धरला. लिपी सुधारणेचा प्रयत्न केला. देशाच्या राजकारणात त्यांनी मार्गदर्शकाची भूमिका बजावली. स्वा. सावरकर अतुलनीय–अजोड वक्ते होते, लेखक होते, इतिहासाचे अभ्यासक, संशोधक आणि इतिहासाचे निर्माते देखील होते. ञ्रंस्कृत, हिंदी, इंग्रजी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. ते उर्दू गझलकार होते. समाजप्रबोधनासाठी त्यांनी नाटकं लिहिली. कविता, पोवाडे, फटके, लावण्या सुद्धा लिहिल्या. असं हे ''शत' नव्हे 'सहस्त्रपैलू'व्यक्तिमत्व !

पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर बॅरिस्टरकीचा अभ्यासा करण्यासाठी १९०६ मध्ये ते लंडनला गेले. तिथे भारत भवन मध्ये राहू लागले. बॅरिस्टरकीच्या अभ्यासाबरोबरच क्रांतीकार्यही सुरू झालं. जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचं मराठीत भाषांतर केलं. त्याला चाळीस पानांची प्रस्तावना लिहिली. ही प्रस्तावना सगळ्या क्रांतिकारकांनी भगवद्गीतेसारखी मुखोद्गत केली. १८५७ चे स्वातंत्र्यसमर लिहिलं. शिखांचा इतिहास लिहिला. फ्री इंडिया सोसायटी अर्थात स्वतंत्र भारत समाजाची स्थापना केली. भारतीय विद्यार्थी संघटीत होऊ लागले. छत्रपती शिवाजी महाराज, गुरू गोविंदसिंग, गुरू नानक अशा महापुरूषांचे स्मृतिदिन, राष्ट्रीय उत्सव, विजयादशमी, रक्षाबंधन असे भारतीय सण साजरे होऊ लागले. अशियन क्रांतिकारकांच्या साहाय्याने बॉम्ब बनवण्याची पुस्तिका मिळवली. तिचं भाषांतर करून पुस्तिकेच्या प्रती भारतात पोहचल्या. ग्रंथामध्ये दडवून पिस्तुले भारतात आली. आणि आता, भारतात क्रांतीचे पडसाद उमटू लागले. एका एका इंग्रज अधिकाऱ्याला यमसदनी पाठवण्यासाठी पिस्तुलांचा वापर होऊ लागला. बॉम्ब फेकले जाऊ लागले. इंग्रजांचे धाबे दणाणले. ह्या सगळ्या घटनांची सूत्रं लंडनमधून हलवली जात आहेत, ह्याचा इंग्रजांना सुगावा लागलाच होता. पुरावा हाती लागताच स्वातंत्र्यवीरांचे मोठे बंधू गणेश दामोदर उर्फ बाबाराव सावरकरांना अटक झाली आणि खटल्याची सुनावणी होऊन जन्मठेप सुनावण्यात आली. ह्या घटनेचा बदला घेण्यासाठी लंडनमधील इम्पीरीयल इन्स्टिट्यूट मध्ये मदनलाल धिंग्राने कर्झन वायलीला आणि नाशिक मध्ये अनंत कान्हेरेनी कलेक्टर जॅक्सनला गोळ्या झाडल्या. अर्थात, ह्या कृत्यासाठी इंग्रज न्यायासनाकडे एकच न्याय होतो.... फचशी !

भारतातील अभिनव भारत कार्यकर्त्यांचा आणि सावरकर घराण्यातील स्त्रियांचा, म्हणजे स्वातंत्र्यवीरांची मातृतुल्य वहिनी, येसूवहिनी आणि पत्नी यमुनाबाई यांचा अतोनात छळ होऊ लागला.

लंडनमधील भारत–भवनला कुलूप लागल. सावरकरांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लागला. सततचे कष्ट, ताण आणि अन्न–पाण्यावाचून केलेली वणवण यामुळे सावरकरांची प्रकृती बिघडली. राहायला घर नाही, ब्रॉन्कायटीसची व्यथा स्वस्थता लाभू देत नाही, आणि पारतंत्र्याच्या शृंखलात जखडलेली भारतमाता सतत मनःचक्षूत येऊन डोळ्यात नीज नाही.... मन भारतमातेकडे, भारतात आप्तेष्टांकडे सतत धाव घेत होते. पण आता परतीचे सगळे मार्ग बंद झाले होते . अशा परिस्थितीत,लंडनपासून जवळच असलेल्या ब्रायटनला, निरंजन पाल यांच्याकडे हवापालटासाठी गेले.

एका सायंकाळी तिथल्या समुद्रकिनारी दुःखी मनस्थितीत सावरकर उभे होते. मदूलालला फाशी होणार... सावरकरांना उदास वाटू लागले. समोर सूर्य अस्ताला जात होता. समुद्राच्या लाटा त्यांच्या पायांना स्पर्श करून मागे...मागे.. जात होत्या. किती मागे ? ञ्रमद्राच्या पलिकडच्या किनाऱ्यापर्यंत तिथे उभी होती भारतमाता ! मचतृभूमीच्या आठवणीने सावरकर व्याकूळ झाले. डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले. तोंडातून अस्फुट उद्गार बाहेर पडले...

ने मजसी ने परत मातृभूमीला
सागरा, प्राण तळमळला...........

शेजारी निरंजन पाल उभे होते. त्यांनी पाहिलं सावरकर काही तरी पुटपुटतायेत....... व्याकूळ झाले आहेत...... निरंजन पाल आपल्या आठवणींमध्ये लिहितात. थोड्याच वेळात सावरकर ओक्साबोक्शी रडू लागले. त्यांचा छोटा मुलगा प्रभाकर देवाघरी गेल्याचं कळलं, तेव्हाही ते इतके रडले नव्हते.

शुक पंजरि व हरिण शिरावा पाशी
ही फसगत झाली तैशी...........

शुक म्हणजे पोपट पंजरि म्हणजे पिंजऱ्यात...... पोपट पिंजऱ्यात किंवा हरिण जाळ्यात अडकावे तशी स्वातंत्र्यवीरांची स्थिती झाली होती.

सावरकर लंडनला, शत्रूच्या देशात का आले होत ? इंग्रजांचा देश आहे तरी कसा ? त्यांचा कायदा काय सांगतो ? त्यांचे शत्रू कोण – मित्र कोण ? ज्ञान प्राप्त करण्यासाठी..... आणि या ज्ञानाचा उपयोग मातृभूमीच्या उद्धारासाठी करता यावा म्हणून....!

गुणसुमने मी वेचियली या भावे
कि तिने सुगंधा घ्यावे ..........

पण, आता हे घडणे अशक्य ! मग या ज्ञानाचा फायदा

काय?

जरि उद्धरणी व्यय नं तिच्या हो साचा
हा व्यर्थ भार विद्येचा........

सागरा, तू म्हणशील की, येथेच राहिलास तर काय बिघडले ? काय येथल्या आकाशात नक्षत्रे नाहीत की येथल्या नगरीत प्रासाद नाहीत ? पण सागरा........

नभि नक्षत्रे बहुत एक परि प्यारा
मज भरतमूमिचा तारा।
प्रासाद इथे भव्य परी मज भारी
आईची झोपडी प्यारी।
तिजवीण नको राज्य मज प्रिय साचा
वनवास तिच्या जरि वनिंचा।

आकाशात खूप नक्षत्रं असतील पण मला मात्र माझ्या भारतभूमीचा ताराच प्रिय आहे. इथे मोठमोठे प्रासाद, सुख, ऐश्वर्य, संपत्ती असेल, पण मला माझ्या मातृभूमीची झोपडीच प्रिय आहे. तिाा सहवास असेल तर मी वनवासही आनंदाने पत्करेन ! सागरा, तुला तुझ्या सरितेची शपथ घालून सांगतोय,

ने मजसी ने परत मातृभूमीला
सागरा, प्राण तळमळला

काय ? या लाटांच्या माध्यमातून तू माझ्याकडे पाहून हसतोच ? हस बाबा...... आज तुझ्यावर आंग्लभूमीची सत्ता आहे. माझी मायभूमी दुर्बल झाली आहे. पण सागरा लक्षात ठेव, वरवर अबला दिसली तरी माझी मायभूमी अबला नाही.

अबला न माझी ही माता रे
कथिल हे अगस्तिस आता रे
जो आचमनी एक क्षणी तुज प्याला...........

तुला एका आचमनात पिऊन टाकणारा पराक्रमी अगस्ती माझ्या मायभूच्या कुशीतच जन्माला आला होता. माझ्या भारतभूमीत आणखी काय काय आहे म्हणून विचातोस ?

ती आम्रवृक्षवत्सलता रे
नवकुसुमयुता त्या सुलता रे
तो बाल गुलाबही आता रे............

आम्रवृक्षासारखी वत्सल, प्रेमळ माझी मातृतुल्य येसूवहिनी आहे, कोमल, नाजुक कुसुमासारखी माझी पत्नी आहे आणि ताज्या टवटवीत, सुगंधीत गुलाबासारखा माझा बाळ आहे हे सागरा, तू माझ्या मातृभूमीला वचन दिलं होतंस की......

मीच पृष्ठी वाहीन
त्वरित या परत आणिन.........

तुझ्या ह्या वचनावर विश्वास ठेवला. पण आता तूच हे वचन विसरालस.......

ने मजसी ने परत मातृभूमीला

सागरा, प्राण तळमळला........

क्रांतीकारक सावरकरांच भावूक हळवं, भावनाविवश मन ह्या काव्यात शद्बबद्ध झालंय. मनात ध्येय्य आणि स्वप्न होतं मातृभूमीच्या स्वतंत्रतेचं, त्यासाठीच घरादारावर तुळशीपत्र ठेवून स्वातंत्र्याचं होमकुंड पेटवलं होतं............ पण आता चारही बाजूंनी जणू अंधारून आलं होतं. आणि मातृभूमीच्या भेटीसाठी जीव तळमळत होता. मचयभूमीला कायमचे अंतरावे लागणार की काय ! अशा मनस्थितीतील भावनेचा उत्स्फुर्त आविष्कार या भावगीतात आहे. भावनेच्या आविष्काराला साजेल अशी प्रसादपूर्ण भाषा आणि कल्पनाविलास आहे. मचयभूमीच्या विरहामुळे जिवाची होणारी तळमख ही एकच एक भावना सर्वत्र भरून राहिलेली............

**ने मजसी ने परत मातृभूमीला**
**सागरा, प्राण तळमळला............ !**

****



## संमेलनाचे शिलेदार


आलाप कोरडे


योगेश कोंडेकर


राजीव एम.पी



वैशाली दहिफळकर


अमोल मोठेराव


वृषाली जोशी


रुपाली बिराडे


ज्ञानेश थोरात


वसंत मोंढे


## दुबई येथील ऐतिहासिक मराठी विश्व साहित्य संमेलनास भारतभरातून उपस्थित साहित्य प्रेमी



संध्या पाडेकर


सुनिता गवळी


अर्चना देशपांडे


मधुकर सावरकर


शाम पाडेकर



विश्वास दाणी


सुमन मुठे


सुनिल पाटील


अरूणा पाटील


श्रावण गवळी



प्रभाकर कुलकर्णी



सुहासिनी तपस्वी


संजीवीनी भारस्कर


स्वाती सुरंगळीकर


विजया वाघ


रत्नाकर गायकवाड



भाउराजे जहागिरदार


शशीकांत सुरांगळीकर


राजलक्ष्मी देशमुख


शशांक साठे


शुभा साठे


मुक्तेश्वर मुनशेट्टीर


शुभदा तांबट


उर्मीला शाहकर


मैथीली परचुरे


सोनाली परचुरे



अशोक सुळे


नवीनचंद्र ताबंट

# दुबई येथील ऐतिहासिक मराठी विश्व साहित्य संमेलनास भारतभरातून उपस्थित साहित्य प्रेमी



रत्नमाला शिवने | रामराव आव्हाड | किसन मढे | स्पृहा मुनशेट्टीवार | बालचंद्र पगारे | गिरीष परांडकर | आशा परांडकर



गौरी कुलकर्णी | कल्पना रानडे | आर्या कुलकर्णी | आस्मी देशपांडे | मधुश्री हाजारनविस | पार्थ पगारिया | स्नेहलता पवार




मिहीर हाजारनविस | मनिषा कुलकर्णी | आनंद देशपांडे | शुभांजली पाडेकर | रेखा गायकवाड | सुधाकर चाऊर | सौरभ कुलकर्णी



अपुर्वा कुलकर्णी | डोळे आसावरी | नरेंद्र शिंदे | राधा कुलकर्णी | सुनंदा दाणी | अंकिता पवार | अंजली सुळे



बद्रयणी विदुला | रोहीनी भालेराव | उषा धुमाळ | विलास चानेकर | तारु विश्वनाथ | सुरेश धुमाळ | चारुशिला वराडे



सुलभा केंडे | यशोदा पगारे | सुमन केंची | हेमंत गोळवाडकर | आरती हाजारनविस | उषा आव्हाड | प्रकाश सप्रे

# दुबई येथील ऐतिहासिक मराठी विश्व साहित्य संमेलनास भारतभरातून उपस्थित साहित्य प्रेमी



सुनंदा पाटील | भाग्यश्री बापट | रत्नप्रभा तारू | चिंतामणी बापट | शकुंतला सप्रे | सरिता चानेकर | अशोक वराडे



दिलिप देशमुख | मिना फुटाणे | गिता जगताप | राजेंद्र गुंड | दिपक पाडेकर | अमित कुलकर्णी | शुभदा चंद्रात्रे



शैलजा पाठक | सुधिर देशपांडे | शैलजा देशपांडे | मधुवती तांबट | श्रीनिधी गायकवाड | शांता हुच्चे | अनुराधा चाऊर



दिवाकर जोशी | कांचन साठे | जयंत शिंपी | वैशाली शिंपी | वसंत पाटील | वैशाली जहागीरदार | विजया जोशी



अनिल जहागिरदार | अंकिता पवार | पुष्पा आगाशे | प्रमिला खिलारी | पार्थ साठे | श्याम व्यास | माधुरी भालेराव



भास्कर आगाशे | धनश्री माणगावकर | दिपक भालेराव | दिलीप आगाशे | दत्तात्रेय हुच्चे | हेमंत गोळवडकर | गोपाल चुरी

# दुबई येथील ऐतिहासिक मराठी विश्व साहित्य संमेलनास भारतभरातून उपस्थित साहित्य प्रेमी


प्रकाश कुलकर्णी


दादासाहेब गोडसे


दत्तात्रेय शिवणे


वासंती कुलकर्णी



वसुधा जोशी


शुभांगी जोगळेकर


अपर्णा खोले


सुनिता उतेकर


सुर्यकांत उतेकर



विजयकुमार शिंदे



शोभा शिंदे


मंगला परब


विनया गोडबोले


सतवान चांदेकर


आनंद सहस्त्रबुध्दे


शामसुंदर देशपांडे



आरती सहस्त्रबध्दे



अनुप्रीता मोडक


राम मोडक


गौरी फडके


चंद्रमोहन फडके


विजयकुमार मानसबर


राजाभाऊ जहागिरदार


शशिकला मनसबदार


पदमावती पालीमकर


निलकंठ मानसबदार


अरुणा दिवानजी


क्रिष्णा बाई


माधुरी तांबे

# 'विश्व पांथस्थ'ची वेबसाईट आणि ॲप

'विश्व पांथस्थ' मासिक छापील व डिजिटल स्वरूपात जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचावे असे प्रयत्न आहेत. वाचकांचा या मासिकाला खूपच चांगला प्रतिसाद आहे. हा अंक यु ए ई व्यतिरिक्त ओमान, बहरीन, कतार, सौदी, कुवेत, सिंगापूर, यु के, कॅनडा, हॉलंड, अमेरिका, जपान, मलेशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, रशिया या देशांत; महाराष्ट्राबाहेर भारतात मध्य प्रदेश, गुजरात, गोवा, कर्नाटक, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, बंगाल, दिल्ली वगैरे राज्ये व महाराष्ट्रात देखील वितरित करण्याची योजना आहे. या सर्व ठिकाणी मराठी मंडळी मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित व स्थायिक झालेली आहेत. आजपर्यंत या सर्वांचा एकत्र असा 'डेटाबेस' तयार झाला नाही. तो तयार करण्यासाठी www.panthastha. com या वेबसाईटची व Panthastha या Android मोबाईल ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. मोबाईल ॲप Google Play Store मधून download व install करता येईल. ॲपवर किंवा वेबसाईटवर रजिस्ट्रेशन केल्यानंतर पांथस्थ चे अंक व लेख , न्यूजलेटर, छोट्या जाहिराती, मोठ्या जाहिराती, पांथस्थ च्या मुलाखती अशी विविध प्रकारची माहिती मिळेल. प्रिंट, वेब व ॲप या सर्व ठिकाणी 'सीमलेस'रीत्या माहिती दिसेल. ॲप इंटरॲक्टिव आहे. तुम्ही तुमच्या ग्रुपचे मेंबर देखील स्वतः रजिस्टर करू शकता. अनेक ग्रुप इथे एकत्रितरीत्या दिसू शकतात. तुम्हाला प्रतिसाद देता येईल. तेव्हा या वेबसाईट व ॲपवर आपण सर्वांनी रजिस्टर करावे.

देश-विदेशातील पांथस्थांनी पुढे येऊन आपले विचार, अनुभव, समस्या व सूचना लेखाच्या स्वरुपात येथे मांडाव्यात. कविता, स्फुट, मुलाखती, पुस्तक परीक्षण, प्रवास वर्णन, यशस्वी NRI व्यक्तींची चरित्रे देखील जरूर पाठवावीत. विविध देशांतील मराठी मंडळांना जर विशेषांक प्रकाशित करायचा असेल तर आमच्याशी जरूर संपर्क करा. तुमचा ग्रुप सोशल मीडियावर कार्यरत असेल तर सर्वांनी या वेबसाईटवर रजिस्टर करा. पांथस्थ मोबाईल ॲप प्ले स्टोअर मधून डाऊनलोड करा. सगळे लेख, विविध जाहिराती, छोट्या जाहिराती पाठवा. लवकरच वधुवर सूचक विभाग देखील पांथस्थ मोबाईल ॲप वर चालू करण्याचा विचार आहे. या सर्वांचा सदस्यांनी लाभ घ्यावा.

एक जाहिरातदार म्हणून तुम्हालाही या सर्व लोकांपर्यंत पोहोचावे, असे निश्चित वाटत असेल. तेव्हा विश्व पांथस्थच्या माध्यमातून तुम्ही किफायतशीररीत्या या सर्व लोकांसमोर आपले उत्पादन, प्रकल्प किंवा सेवा (प्रॉडक्ट, प्रोजेक्ट किंवा सर्विस) व्यवसाय किंवा कंपनी याबद्दल माहिती पोहोचवू शकता. बांधकाम व्यावसायिक व गृह योजना, (Builders, रिअल इस्टेट), वैद्यकीय सेवा (Hospitals, मेडिकल व हेल्थ केअर), शैक्षणिक संस्था व सेवा (Education Institutes), पर्यटन (Travel व Tourism), रेस्टॉरंट, हॉटेल व Hospitality, सर्व उद्योग व उद्योजक, खासगी व सरकारी योजना, सामाजिक संस्था या सर्वांसाठी अनिवासी मराठी भारतीयांपर्यंत पोहोचण्याची विश्व पांथस्थ ही एक सुवर्णसंधी आहे . यापूर्वी कदाचित असा मंच उपलब्ध नसल्याने तुम्ही त्यांच्यापर्यंत पोहचला नसाल, पण आता ही संधी आहे. तेव्हा आपण सर्वांनी याचा लाभ घ्यावा, विश्व पांथस्थसाठी जाहिरात देऊन या उपक्रमाला प्रोत्साहन द्यावे आणि विश्व पांथस्थच्या सर्व उपक्रमांत आनंदाने सहभागी व्हावे, ही नम्र विनंती



**संपर्क** : email id: editor@panthasha.com website: www.panthastha.com
Mobile App: Panthastha (Playstore) Mobile: +91 9860678844

# विश्व मराठी साहित्य संमेलनाची परंपरा...
## शिवसंघ प्रतिष्ठान




प्रथम साहित्य संमेलन – अंदमान
अध्यक्ष : मा. श्री. विजय कुवळेकर



व्दितीय साहित्य संमेलन – श्रीलंका
अध्यक्ष : मा. श्री. निनाद बेडेकर



तृतीय साहित्य संमेलन – नेपाळ
अध्यक्ष : मा. श्री. डॉ. विनय सहस्त्रबुध्दे



चतुर्थ साहित्य संमेलन – थायलँड
अध्यक्ष : मा. श्री. डी. एस. कुलकर्णी



पाचवे साहित्य संमेलन – मॉरीशस
अध्यक्ष : मा. श्री. श्याम जाजू



सहावे साहित्य संमेलन – भुतान
अध्यक्ष : मा. श्री. संजय आवटे

स्वा. सावरकर अभिवादन यात्रा

# अंदमान

१ लाख
सावरकरप्रेमींना
नेण्याचा संकल्प !



ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसबेंरसाठी
नावनोंदणी सुरू



आयोजक
कॅप्टन निलेश गायकवाड

आयोजक
शिवसंघ
प्रतिष्ठान

## बुकींगसाठी संपर्क

नाशिक : 9422254521 । पुणे : 9422773503

मुंबई : 9969739479

* शिवसंघ प्रतिष्ठान,द्वार केतकी बिल्डींग, अलका टॉकिज शेजारी, नवी पेठ, पुणे –४११००३०
* शिवसंघ प्रतिष्ठान,द्वार ७, मातृकृपा बिल्डींग, गडकरी रंगायतन नाट्यगृह जवळ, ठाणे – ४००६०२
* शिवसंघ प्रतिष्ठान, ३ रा मजला, विठ्ठल चरणी संकुल, बिगबजार समोर, कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५